# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००५ |
| वर्ष | : | चौथे |
| अंक | : | ६ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ९३**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सहावे / अंक ६/ मे २००५

## संपादकीय

### संगणक आणि मराठी

संगणकाधारित ज्ञान शाखांचा इतक्या वेगाने प्रसार व वाढ होत आहे की त्या शाखांतील या विषयाची परिभाषा समजावून घेणे अवघड बनत आहे. त्रे मूळ इंग्रजी भाषेचा आधार घेऊन विकसित झालेली ही परिभाषा जेव्हा भारतासारख्या बुहभाषिक देशात वापरली जाते तेव्हा त्या भाषेतील परिभाषिक शब्दांना भारतीय भाषांत पर्याय निर्माण होणे, ते मान्य होणे व समाज व्यवहारात रुळणे, ही प्रक्रिया घडून येण्यासाठी नैसर्गिक अवधी जावा लागतो. त्यानंतरच परिभाषिक कोशांची निर्मिती होऊ शकते. असे परिभाषिक शब्द व त्यांचे विशिष्ट भाषेतील मान्य पर्याय जितके जास्त तितकी ती भाषा अधिक समृद्ध ठरते. भाषांतर करणे, भाषाविषयक प्रश्नांची उत्तरे शोधणे, सार तयार करणे अशा अनेकविध कार्यांत परिभाषिक कोश उपयुक्त ठरू शकतात. मराठीत भाषासंचालनामध्ये वेगवेगळ्या विषयांवरील बनविलेले काही कोश हे या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

पण संगणकासंबंधित तंत्रज्ञानांचा सर्व समावेशक व अधिकृत म्हणता येईल असा परिभाषिक कोश अद्याप वापरात आलेला नाही. या दृष्टीने सर्वमान्य होतील असे प्रयत्न होणे ही मराठी भाषा विकासाची गरज आहे. काही शब्द व त्यांचे पर्याय मान्यता पावले आहे. उदा. डेटा म्हणजे माहिती, डेटाबेस म्हणजे माहिती संचय. यातच डेटा ॲनॅलिसिसचा माहिती विश्लेषण हा पर्याय ठरू शकेल. पण डेटा पेंटिंग(माहिती रूपांतर), डेटा मायनिंग व त्यापासून बनविल्या जाणाऱ्या अनेक शब्दांचे पर्याय भाषा तज्ञांनी एकत्रित येऊन बनणे गरजेचे आहे. फायरवॉल, नॉलेज मॅपिंग, इन्फर्मेशन रिसोर्सेस मॅनेजमेंट (आयआरएम), इनफर्मेशन वेअरहाऊसिंग इ. अनेक संकल्पनांची जुजबी भाषांतरे करता येतील पण या भाषांतरांना परिभाषेचा दर्जा व सर्व मान्यता येणे ही बाब वेगळी आहे.

या तंत्रज्ञानातील नवीन येण्याच्या व बाद होण्याचा वेगही मोठा आहे. कोबॉल, फोट्रान, डी बेस, बेसिक या भाषांबाबतच्या शब्दांचा परिभाषा रूढ होण्याचा आतच या भाषा अस्तंगत झाल्या. नव नवीन माहितीचा विस्तार ज्या वेगाने होतो व ती वापर करण्यात जिथपर्यंत वापर करतो तोवरच परिभाषा वापरली जाणार आहे. त्या तंत्रामधील ज्ञानाची वाढ झाली की आधीचे कालबाह्य ठरत जाणार त्यामुळेच अशा परिभाषा निर्मितीची व्यवस्थाही सक्षमच ठेवावयास हवी. गेल्या चार पाच वर्षांत हा वेग अधिकच वाढत आहे. त्यामुळे सातत्याने आपल्या भाषेतील या विषयांची परिभाषा तपासणे, वापरणे महत्त्वाचे आहे.

या पार्श्वभूमीवर 'संगणक आणि मराठी' या दिशेने आमच्या विद्या प्रसारक मंडळाच्या परिसरात सुरु झालेले प्रयत्न महत्त्वाचे ठरतील. या विषयातील पहिली कार्यशाळा हा अंक येईल तेव्हा झालेली असेल.

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सहावे / अंक ६ / मे २००५

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुले १९९६
(वर्ष ९ वे / अंक ११ वा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शतकत्रय कर्ता भर्तृहरी (लेखांक ४था) | शं. बा. मठ | ३ |
| २) | 'भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधने- २ | यशवंत साने | ८ |
| ३) | समाज प्रबोधन पत्रिकेतील ग्रंथपरिचय आणि ग्रंथपरीक्षणांची सूची | सूची संकलन : स्मिता सत्यवान सावंत | १५ |
| ४) | 'प्रवीण दवणे यांना आलेले पत्र | शिवाजी साळुंके | २२ |
| ५) | पालक, विद्यार्थी, शिक्षक समन्वय - एक समस्या | सौ. अरुणा अरुण सामंत | २३ |
| ६) | ''कागद विरहित ग्रंथालये '' | योगानंद दादाजी अहिराव | २७ |
| ७) | आवर्जून वाचावं अस पुस्तक 'रक्त-रंग' | मोहन पाठक | ३१ |
| ८) | महाराष्ट्रातील स्त्री संत - मुक्ताई | सौ. मालती देवधर | ३३ |
| ९) | आकाश आणि निरीक्षण (पंचागांच्या मदतीने) | प्रा. सुरेंद्र बापट | ३५ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३८ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# शतकत्रय कर्ता भर्तृहरी

*भर्तृहरीच्या नीतिशतका संबंधातील लेखमालेतील श्री. शंकरराव मठ यांचा चौथा लेख देत आहोत. - संपादक*

**(लेखांक चौथा)**

परोपकारी लोकांच्या स्वभावाचे दिग्दर्शन या खालील श्लोकात केलेले आहे.

*भवन्ति नम्रा: तरव: फलोद्गमे ।*
*नवाम्बुभि: भूमि विलम्बनोघना : ।*
*अनुद्धता: सत्पुरुषा : समृद्धिभि: ।*
*स्वभाव एवैष परोपकारिणाम् ॥ ३२॥*

*वृक्ष फार लवतो फलभारे । लोंबती जलद घेउनि नीरे ।*
*थोर गर्व न धरी विभवाचा । हा स्वभाव उपकारपरांचा ॥*
- वामन पंडित

फळांच्या बहराने वृक्ष खाली लवतात, नूतन जलाने मेघ पृथ्वीवर (पडण्यासाठी) लोंबतात. तसेच सत्पुरुषही वैभवाने नम्र होतात. परोपकारी लोकांचा हा स्वभावच असतो.

पुरुषाचे खरे भूषण कोणते याचे वर्णन कवीने खालील श्लोकात केले आहे.

*श्रोत्रं श्रुतेनैव न कुण्डलेन ।*
*दानेन पाणि: न तु कङ्कणेन ।*
*विभाति काय: करुणापराणां ।*
*परोपकारै: न तुचन्दनेन ॥३३॥*

ज्ञानग्रहण केल्याने कानाची शोभा वाढते, कुण्डलाने नव्हे, दानधर्म करण्याने हाताची खरी शोभा वाढते केवळ सोन्याच्या अलंकाराने नव्हे, परोपकार करण्याने देहाची शोभा वाढते केवळ चन्दनाच्या लेपाने नव्हे.

*सन्मित्र लक्षण पुढील कवितेत सांगितले आहे.*

*पापात् निवारयति योजयते हिताय ।*
*गुह्यं निगूहति गुणान् प्रकटीकरोति ।*
*आपद्गतं च न जहाति ददाति काले ।*
*सन्मित्र लक्षणमिदं प्रवदन्ति सन्त: ॥३४॥*

सन्मित्र पाप कर्मापासून परावृत्त करतो आणि कल्याणकारी गोष्टीत लक्ष द्यावयाला लावतो. कोणतीही गुप्त गोष्ट तो पट्कर्णी करत नाही, गुणांचीच फक्त वाहवा करतो. संकटकाळी मैत्री सोडून जात नाही. यथाशक्ती मदत करतो. ही खऱ्या मित्राची लक्षणे आहेत असे सज्जन लोक म्हणतात.

भर्तृहरी व्यक्तींची श्रेणी कथन करत आहे. हा श्लोक लक्षात घेण्यासारखा आहे.

*एते सत्पुरुषा: परार्थघटका: स्वार्थं परित्यज्य ये*
*सामान्यास्तु परार्थमुद्यमभृत: स्वार्थाविरोधेन ये ।*
*तेऽमी मानुषराक्षसा: परहितं स्वार्थाय भिघ्नन्ति ये ।*
*ये तु घ्नन्ति निरर्थकं परहितं ते केन जानीमहे ॥३५॥*

स्वार्थ बाजूला सारून दुसऱ्याचे हित करतात ते सत्पुरुष होत. आपल्या स्वार्थाला बाधा न आणता दुसऱ्याच्या हितार्थही तत्परतेने झटतात ते सामान्यपुरुष होत. स्वत:च्या स्वार्थासाठी इतरांचे हित डावलतात ते नरराक्षस होत, आणि जे कोणतेही कारण नसताना इतरांच्या हितगोष्टींच्या आड येतात. त्यांना कोणत्या श्रेणीत घालावे समजत नाही.

अशा प्रकारचे नरराक्षस आपल्याला व्यवहारात नेहमीच आढळतात ही गोष्ट कवीने अत्यंत मार्मिकपणे टिपली आहे. ये तुदनन्ति निरर्थकं पर हितं ते के न जानीमहे ॥ या नराधमाला कोणत्या श्रेणीत टाकावे काही कळत नाही. साधु सज्जनांची लक्षणे या खालील श्लोकात सांगितले आहे.

*तृष्णां छिन्धि, भजक्षमां जहि मदं पापे रतिं मा कथा:।*
*सत्यं ब्रूहि अनुयाहि साधुपदवी, सेवस्व विद्वत् जनान् ।*
*मान्यात् मानय, विद्विषोऽपि अनुनय, प्रच्छादय स्वान् गुणान् ।*
*कीर्तिं पालय, दु:खिते कुरुदयां, एतत् सतां लक्षणम् ॥३६॥*

वासनाना तिलांजली दे, क्षमा अंगी धारण कर, गर्व वा उद्धटपणा टाकून दे, पापी गोष्टी पासून परावृत्त हो, नेहमी खरे बोल, साधूंच्या मार्गाने वाटचाल कर, विद्वानांचा आदर कर त्यांची सेवा कर, आदरणीय लोकांचा सन्मान कर, शत्रूवरही प्रेम कर, स्वत:च्या गुणांची वाच्यता करू नकोस, लौकिक गोष्टीत उत्कर्ष पाव, गांजलेल्या लोकावर दया कर या साऱ्या सज्जन लोकांच्या खुणा आहेत.

संतांची लक्षणे वेगळ्या पद्धतीने कवीने इथे मांडलेली आहेत.

*मनसि वचसि काये पुण्यपीयूषपूर्णा:।*
*त्रिभुवनमुपकारश्रेणिभि: प्रीणयन्त: ।*
*परगुण परमाणून् पर्वतीकृत्य नित्यं ।*
*निजहृदि विकसन्त: सन्ति सन्त: कियन्त: ॥३७॥*

मन, वाणी आणि शरीर पुण्यामृताने काठोकाठ भरून राहिले आहे. आपल्या चांगल्या वागणुकीने तीनही लोकात आनंद निर्माण केला आहे. दुसऱ्यांचे अत्यंत अल्पगुणही पर्वताएवढे मोठे करून आपल्या हृदयाचा जगाला प्रत्यय दिलेला आहे असे सज्जन किती आढळतात?

धीर गंभीर लोक आपले उद्दिष्ट साध्य झाल्याशिवाय स्वस्थ बसत नाहीत.

*रत्नै: महार्है: तुतुषु: न देवा: । न भेजिरे भीमविषेण भीतिम् ।*
*सुधां विन न प्रययु: विरामं । न निश्चितार्थात् विरमन्ति धीरा:*
*॥ ३८ ॥*

अमोल रत्नांनी देव संतुष्ट झाले नाहीत, हालाहल विष निघाले म्हणून घाबरून गेले नाहीत. अमृतप्राप्ती होईपर्यंत ते स्वस्थ राहिले नाहीत, प्रज्ञावंत निश्चित ध्येय साध्य होईपर्यंत थांबत नाहीत.

विवेकी थोर पुरुषाची दृष्टी ध्येयावर स्थिर असते. अडचणी वा परिस्थितीला तो बधत नाही.

*क्वचित् भूमौ शय्या क्वचिदपि च पर्यङ्कशयनं*
*क्वचित् शाकाहारी क्वचिदपि च शाल्योदनरुचि: ।*
*क्वचित् शाकाहारी क्वचिदपि च दिव्याम्बरधरो*
*मनस्वी कार्यार्थी न गणयति दु:खं न च सुखम् ॥३९॥*

आपले कार्य साधणारा धैर्यवान माणूस सुख दु:ख जुमानत नाही. कधी जमिनीवर त्याचा बिछाना असेल कधी पलंगावर पहुडत असेल, कधी भाजी-पाल्यावर भूक भागवील तर कधी उत्तम तांदळाचा भात खाईल, कधी गोधडी गुंडाळून राहील तर कधी उंची वस्त्रे परिधान करील. या सर्व अवस्थात त्याचे चित्त शांत राहून नियोजित कर्माकडेच त्याचे लक्ष असेल.

माणसाचे शील हेच परमभूषण होय अशाप्रकारे शीलवान माणसाची प्रशंसा केली आहे.

*ऐश्वर्यस्य विभूषणं सुजनता, शौर्यस्य वाक्संयमो*
*ज्ञानस्योपशम: श्रुतस्य विनय:, वित्तस्य पात्रे व्यय: ।*
*अक्रोध: तपस:, क्षमा प्रभवितु: धर्मस्य निर्व्याजता*
*सर्वेषां अपि सर्व कारणमिदं शीलं परं भूषणम् ॥ ४० ॥*

सौजन्य हे ऐश्वर्याचे भूषण, वाणीचा संयम हेच शूरतेचे भूषण, ज्ञानाचे लक्षण शांत भाव, विद्वत्तेचे लक्षण विनय, संपत्तीचे लक्षण सत्पात्री दानधर्म, तपाचे भूषण क्रोध रहितता, पराक्रमाचे भूषण क्षमा, सरळपणा हे धर्माचे भूषण,

ह्या सर्व गुणांची मूळ कारणेही आहेत व या सर्वात श्रेष्ठ भूषण शील हेच होय.

विवेकी पुरुष आपला न्यायाचा मार्ग कधीही सोडत नाहीत.

*निन्दन्तुनीति निपुणा यदि वा स्तुवन्तु ।*
*लक्ष्मीः समाविशतु गच्छतु वा यथेष्टम् ।*
*अद्यैव वा मरणमस्तु युगान्तरे वा*
*न्याय्यात् पथः प्रविचलन्ति पदं न धीराः ॥४१॥*

*वानोत निंदोत सुनीतिमंत । चलो असो वा कमलागृहात ।*
*हो मृत्यु आजीच घडो युगांती । सन्मार्ग टाकूनि भले न जाती ।*

- वामन पंडित

कोणी निंदोत वा कोणी वंदोत (स्तुती करोत) लक्ष्मीचा घरात प्रवेश होवो अगर ती निघून जावो, मृत्यू आजच होवो वा युगानंतर होवो विवेकी पुरुष सन्मार्ग कधीच सोडून जात नाहीत.

सन्तजनांवर संकटाचा मारा जरी झाला तरी ते डगमगत नाहीत, प्रगती करत राहतात.

*छिन्नोऽपि रोहति तरुः । क्षीणोऽपि उपचीयते पुनश्चन्द्रः ।*
*इति विमृशन्तः सन्तः । संतप्यन्ते न ते विपदा ॥४२॥*

*की तोडिला तरु फुटे आणखी भराने ।*
*तो क्षीणहि विधु महोन्नति घे क्रमाने ।*
*जाणोनि हे सुजन ज्या दुबळीक आली ।*
*त्याशी कदा न करितीच भले टवाली ॥*

- वामन पंडित

वृक्ष तोडला तरी पुनः फुटतो, क्षीण झाला तरी चंद्र पुनः कलेकलेने वाढतो असा विचार करणारे संत संकटाने ग्रस्त होत नाहीत.

पूर्व कर्मामुळे वा पूर्वी आचरण केलेल्या तपामुळे मानवाचे भाग्य योग्य समयी सुफलित होते.

*नैवाकृतिः फलति नैव कुलं न शीलं ।*
*विद्यापिनैव च यत्नकृतापि सेवा ।*
*भाग्यानि पूर्वतपसा खलुसंचितानि ।*
*काले फलन्ति पुरुषस्य यथैव वृक्षाः ॥४३॥*

रूप, कुल, शील, विद्या प्रयत्नपूर्वक केलेली सेवा हे काही फलदायक ठरत नाहीत. झाडाना जसे योग्य वेळी फळे येतात तसेच पूर्व पुण्याईने प्राप्त होणारे भाग्य योग्य वेळ येताच सुफलित होते. (या जन्मातील कर्माचे फळ याच जन्मात मिळते असे नसून पुढील जन्मातही प्राप्त होते यालाच दैवयोग असे म्हटले जाते.) येथे शूराचे वर्णन केले आहे.

*एकेनापि हि शूरेण । पादाक्रान्तं महीतलम् ।*
*क्रियते भास्करेणेव । स्फारस्फुरित तेजसा ॥४४॥*

शूर एकटा असला तरी तो पृथ्वीतल पादाक्रांत करतो. एकाकी सूर्य आपल्या प्रभावी तेजाने संपूर्ण विश्व व्यापतो.

कोणत्या प्रसंगी पुरुषाने कसे वागावे या संबंधीचा उपदेश या खालील श्लोकात केला आहे.

*असन्तो नाभ्यर्थ्याः सुहृदपि न याच्यः कृशधनः*
*प्रिया न्याय्या वृत्तिः मलिनं असुभङ्गेऽपि असुकरम् ।*
*विपदि उच्चैः स्थेयं पदमनुविधेयं च महतां*
*सतां केनोद्दिष्टं विषममसिधाराव्रतमिदम् ॥ ४५॥*

दुष्ट प्रवृत्तीच्या माणसाकडे याचना (मदत) कधी करू नये. गरीब मित्राकडे मदतीची याचना करू नये, संकटसमयी मनाची उंच पातळी ठेवणे, मोठ्या लोकांचा मार्ग सतत अनुसरणे, नेहमी प्रिय व न्यायी वर्तन ठेवणे, प्राणावर बेतले असताना देखील पापाचरण न करणे असे खडतर तलवारीच्या पातीवर चालण्याचे व्रत संत आचरत असतात त्यांना कोणी सांगितलेले नसते.

दुर्दैव ओढवले असताही सज्जन माणूस हीन कर्म करण्यास प्रवृत्त होत नाही हे एका अन्योक्तीने कविने वर्णिले आहे.

*क्षुत् क्षमोऽपि जराकृशोऽपि शिथिल प्राणोऽपि कष्टांदशां*
*आपन्नोऽपि विपन्नदीधितिरपि प्राणेषु गच्छत्सु अपि।*
*मत्तेभेंद्र विभिन्न कुम्भकवलग्रासेक बद्धस्पृह:*
*कीं जीर्णं तृणमत्ति भानमहतां अग्रेसर: केसरी ॥४६॥*

भुकेने कासावीस झालेला असला, म्हातारपणाने क्षीणबळ झाला असला, प्राण कंठाशी आले असतानाही, उन्मत्त गजराजाचे गंडस्थळ फोडून त्याच्या मांसाचा आस्वाद घेणारा तो सिंह काय वाळलेले गवत खाईल? कदापि नाही.

मानी व सज्जन माणूस विपत्काळी देखील हीन आचरण करणार नाही हेच कविने सांगितले आहे. स्वाभिमानी पुरुष दुसऱ्याने केलेला अपमान सहन करीत नाही असे कवीने म्हटले आहे.

*यत् अचेततोऽपि पादै: स्पृष्ट: प्रज्वलति सवितु: इनकान्त:।*
*तत् तेजस्वी पुरुष: परकृतनिकृतिं कथं सहते ॥ ४७॥*

निर्जीवी असूनही सूर्यकान्तमणी सूर्याचे किरण स्पर्श करताच उग्र होतो. मग सजीव तेजस्वी मनुष्य दुसऱ्याने केलेला अपमान सहन करील काय?

कदापि सहन करणार नाही हेच खरे.

मनुष्याच्या मन:स्थितीवर वस्तूचे लहान मोठे पण अवलंबून असते.

*परिक्षीण: कश्चित् स्पृह्यति यवानां प्रसृतये*
*स पश्चात् संपूर्णो गणयति धरित्रीं तृणसमाम् ।*
*अतश्चानैकान्त्यात् गुरुलघुतयाऽर्थेषु धनिनां*
*अवस्था वस्तूनि प्रथयति च संकोचयतिच ॥४८॥*

एखाद्या गरीब माणसाला पसाभर सातूची गरज असते, नंतर तो श्रीमंत झाल असता जगाला तुच्छ मानतो, म्हणून माणसाची जशी बरी वाईट आर्थिक परिस्थिती असेल त्या प्रमाणे वस्तूचे स्वरूप लहान मोठे ठरते कारण ते मन: सापेक्ष असते.

राजनीति ही वारांगनेप्रमाणे विभिन्न असते.

*सत्यानृताच परुषा प्रियवादिनीच ।*
*हिंस्त्रा दयालुरपि चार्थपरा वदान्या ।*
*नित्यव्यया प्रचुरनित्यधनागमाच ।*
*वाराङगनेव नृपनीति अनेक रूपा ॥ ४९॥*

कधी खरे तर कधी खोटे बोलणारी, कधी कठोर कधी दयार्द्र, कधी कंजूष तर कधी उदार, कधी फार खर्चिक तर कधी पैसा कमावणारी अशी अनेक रूपे धारण करणाऱ्या वेश्येसारखी राजनीति असते.

विधिलिखित जितके, तेवढेच भाग्य आपल्या वाट्याला येते तरी दीनवृत्ती धारण करू नये.

यद्धात्रा निजभाल पट्टलिखितं स्तोकं महत् वा धनं
तत्प्राप्नोति मरुस्थलेऽपि नितरां मेरौच नातोऽधिकम् ।
तत् धीरोभव वित्तवत्सु कृपणां वृत्तिं वृथा मा कृथाऽ,
कूपे पश्य पयोनिधौ अपि घटो गृण्हाति तुल्यं जलम् ॥५०॥

ब्रह्मदेवाने आपल्या कपाळावर जे काही लिहून ठेविले आहे तेवढेच धन आपल्याला मिळेल. मग तो माणूस मरुभूमीतला असो किंवा मेरुपर्वतावर असो तरी त्याला तितकेच धन मिळणार. त्याहून अधिक नाही. म्हणून मानवा तू धीर धर धनाढ्याकडे उगाच द्रव्याची याचना करू नकोस. एक गोष्ट लक्षात घे तुझी घागर विहिरीत बुडवलीस काय अगर समुद्रात बुडवलीस काय त्यात पाणी तितकेच भरणार. घागरीचा आकार असेल तितकेच पाणी आत येणार.

दुष्ट लोकांचे स्वभाव सिद्ध वर्णन

*अकरुणत्वं अकारण विग्रह: ।*
*परधने परयोषितिच स्पृहा ।*
*स्वजनबंधुजनेषु असहिष्णुता ।*
*प्रकृति सिद्ध मिदं हि दुरात्मनाम् ॥५१॥*

निष्ठुरता, अकारण भांडण करण्याची वृत्ती, परद्रव्य आणि परस्त्री यावर दृष्टी, सज्जन व इष्टमित्र यांच्याशी असहिष्णुता, हा दुष्टांचा मूळ स्वभावच बनून राहिला आहे.

पुढील श्लोकात सतत सलणारी सात शल्ये कोणती याचे दिग्दर्शन कवीने केले आहे.

*शशी दिवसधूसरो, गलित यौवनाकामिनी,*
*सरो विगतवारिजं मुखं अनक्षरं स्वाकृते: ।*
*प्रभु: धनपरायण: सतत दुर्गत: सज्जनो*
*नृपाङ्गणगत: खलो, मनसि सप्तशल्यानि मे ॥ ५२॥*

दिवसा फिकट दिसणारा चंद्र, तारुण्य ओसरलेली सुंदर स्त्री, कमळ नसलेले सरोवर, देखण्या माणसाचे मूक वदन, धनलोभी मालक, नेहमी दुर्दैवाने पीडित सज्जन आणि राजदरबारी वावरणारा दुर्जन, ही माझ्या मनाला बोचणारी सात शल्ये आहेत.

सेवाधर्म किती कठिण आहे यावरील मार्मिक भाष्य या कवितेत आहे.

*मौनात् मूक: प्रवचनपटु: वातुलो जल्पको वा*
*धृष्ट: पार्श्वे वसति च तदा दूरतश्चाप्रगल्भ: ।*
*क्षान्त्या भीरु: यदि न सहते प्रायशो नाभिजात:*
*सेवाधर्म: परमगहनो योगिनां अपि अगम्य: ॥५३॥*

सेवक अबोल असेल तर मुख दुर्बळ, बोलका असेल तर वात झालेला किंवा बडबड्या, जवळ वावरत असेल तर उद्धट, आणि दूर राहिला तर अजाण, सहनशील असेल तर भित्रा, सहनशील नसेल तर गांवढळ अशाप्रकारे मालक सेवकाबद्दल मत करतो. सेवाधर्म हा फार अगाध आहे, योगी लोकानाही याचा थांगपत्ता लागत नाही.

या जगात दुर्जन सज्जनांशी अकारण वैर धरतात. हा त्यांचा स्वभावच असतो.

*मृगमीन सज्जनानां तृणजळसंतोष विहित वृत्तीनां ।*
*लुब्धक धीवर पिशुना निष्कारण वैरिणो जगति ॥ ५४॥*

गवत, पाणी, समाधानी अगर संतुष्ट वृत्तीने राहणारे अनुक्रमे हरीण, मासे आणि सज्जन याना फासेपारधी, कोळी आणि दुर्जन हे अकारण शत्रू होत.

महात्म्यांची भूषणे (अलंकार) कोणती याचे वर्णन पुढील कवितेत आढळेल.

*करे श्लाघ्य: त्याग: शिरसि गुरुपादप्रणयिता ।*
*मुखे सत्यावाणी विजयिभुजयो: वीर्यमतुलम् ।*
*हृदि स्वच्छा वृत्ति: श्रुतमधिगतैकव्रतफलं ।*
*विनापि ऐश्वर्येण प्रकृति महतां मण्डनमिदम् ॥ ५५॥*

सत्पात्री दानाने हात सुंदर दिसतो, गुरुचरणांच्या वंदनाने मस्तक शोभून दिसते, मुख सत्यभाषणाने सुशोभित आहे, अद्वितीय पराक्रमाने बाहू शोभून दिसतात, हृदय निर्मळ वृत्तीने अलंकृत होते, ईश्वर प्राप्तीफळाचे एकमेव अध्ययन कृतार्थ करते. स्वभावत: जे थोर मनाचे आहेत त्यांचे हे श्रीमंती नसतानाही, अलंकार आहेत.

- शं.बा.मठ
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

# भारतीय संस्कृति - बीज, मॉडेल व साधने

*वैश्विक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा दुसरा लेख. विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रीत ठेवावेत ही विनंती - संपादक*

(भाग २)

**पार्श्वभूमी :**

आपल्या मागील एप्रिल २००५ च्या याच मासिकांच्या लेखात, आपण भारतीय संस्कृतीच्या बीजरुपाचा मुद्दा व त्या 'संस्कृती संवर्धना'साठी पोषक साधने भाषा व इतर तंत्रे यांचा उल्लेख केला होता.

**संस्कृतीचे मॉडेल :**

त्याचबरोबर अँटोनियो निकलास यांनी संस्कृतीच्या 'मॉडेल'चा शोध व रूपाचा संदर्भ शोधण्याची आवश्यकता प्रतिपादली होती.

**विश्वसंकल्पना :**

ज्याला तत्वज्ञानामध्ये World View म्हणजे विश्वसंकल्पना म्हणतात - त्याच रोखाने भारतीय संस्कृतीचा विचार करताना, विश्वाच्या निर्मितीची 'Creation' ची संकल्पना व "Vedic Cosmology" ह्याचा अभ्यास अत्यंत आवश्यक मानला पाहिजे.

काय आहे याचे स्वरूप?

**दृश्य जगत :**

मुख्य मुद्दा म्हणजे सध्याचे जे 'Rationalist' जड बुद्धिवादी व Scientific व Secular (निधर्मी) विश्वास व Modern Culture आहे, त्यात ह्या दृश्य जगाखेरीज 'दुसऱ्या जगाच्या' अस्तित्वाबद्दल काहीही कल्पना वा विश्वास नाही. हे दृश्य जग तर नाशिवंत आहे. हे सत्य विज्ञानाला मान्य आहे.

एव्हढेच नव्हे तर त्या 'दृश्य' जगाबद्दल फारच थोडी व तुटपुंजी माहिति व 'प्रत्यक्ष सत्य सिद्ध ज्ञान' आहे. ज्ञानाची प्रक्रियाही एकांगी व सांप्रदायिक (वैज्ञानिक) आहे. विज्ञानाच्या संशोधनाचा कल हा 'Mass Destruction Weapons' व 'Consumerism पोषक Technology कडे झुकला आहे. 'फंडामेंटल रिसर्च' नावलाच आहे.

हिंदू किंवा वेदिक धर्माखेरीज इतर धर्मातही अत्यंत पुसट, अपूर्ण व न पटणारे किंवा भौतिक ज्ञानाशी विसंगत असे 'विश्वरूप' ज्ञान आहे.


**व्यक्त व अव्यक्त :**

त्या तुलनेने हिंदू किंवा वेदिक ज्ञानाच्या विश्वरूपाच्या संकल्पना प्राप्त भौतिक ज्ञानाशी मिळत्या जुळत्या व 'अव्यक्त' जगाबद्दल संपूर्ण - अलगपणे वैशिष्टपूर्ण व स्वतंत्र व Comprehensive अशा आहेत. हा विषय मोठा आहे पण तो तपासून बघण्या योग्य व पटणारा आहे.

**व्याहृति :**

'अव्यक्तम् अनंतम् Avyaktam Anantam व व्यक्तम Vyaktam ह्यांची प्रतिकात्मक चित्रे (२) जोडली आहेत. हे योगी अप्रबुद्ध (नागपूर) ह्याच्या 'The Science of Yoga' ह्या पुस्तकांतून घेतले आहे. तसेच 'तीन सप्तक'


अव्यक्तम् अनंतम्
AVYAKTAM ANANTAM




FOR EXPLANATION SEE APPENDIX - I

(चित्र : १)

तीन सप्तक
THREE SAPTAK




FOR EXPLANATION SEE APPENDIX - II

(चित्र : २)

(संगीतातील) Three Saptak हेही चित्र जोडले आहे.

ह्या सात 'प्लेनसना' (पातळ्या) व्याहृति: म्हणतात. 'व्यहृति' म्हणजे 'सूक्ष्म ज्ञानाची पातळी' ही एक म्यूझिकल स्केलची आहे. हे लक्षात येईल.

Dr. Fredries Blanker म्हणतात. 'This universe is a great accoustical pattern. The Seven planes are identifcal with the Seven notes of the Indian Musical Scale.

योगी अप्रबुद्ध म्हणतात, 'the existence of a Cosmos is due to the undulations of the primary substance between the two points 'Avyakta' and 'Vyakta'.

भगवद्‌गीता (अ ८ १८, १९) दर्शविते की,

'अव्यक्ताद्व्यक्तय: सर्वा: प्रभवन्त्यहरागमे
राज्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ॥ १८॥

भूतग्राम: स एवायं भूत्वा भूत्वा प्रलयिते
राज्यागमेऽवश: पार्थ प्रभवत्यहरागमे ॥१९॥

हा (ब्रह्मदेवाचा) दिवस सुरू झाला म्हणजे अव्यक्तापासून सर्व व्यक्त (पदार्थ) निर्माण होतात आणि रात्र सुरू झाली म्हणजे पूर्वोक्त अव्यक्तात लय पावतात.

भूतांचा तोच हा समुदाय (याप्रमाणे ) पुन: पुन: जन्मून अवश होत्साता म्हणजे स्वत: इच्छा असो वा नसो (यंत्रात घातल्याप्रमाणे) रात्र सुरू झाली की लय पावतो, आणि हे पार्था ! दिवस सुरू झाला कीं (पुन:) जन्मतो. (भाषांतर - लो. बाळ गंगाधर टिळक)

**पिंडी ते ब्रह्मांडी :**

महायोगी अरविंद काय म्हणतात ते पाहू या.

"The Godhead has built this universe in a Complex System of worlds, which we find both within us and without, subjectively cognised and

objectively sensed."

''परमेश्वराने हे जग एका गुंतागुंतीच्या जगाच्या क्रमामध्ये रचले आहे. आपल्याला ते देहांतर्गत व देहाबाहेर सापडते आणि आपण ते संकल्पनास्वरुपात जाणतो, वस्तुनिष्ठपद्धतीने अनुभवतो, भोगतो.

**वैश्विक व मानसिक पातळ्यासंबंधी :**

"These principles are psychological, for since all creating is a formation of the spirit, every external system of worlds must in each of its planes be in material correspondence with some power or rising degree of consciousness of which it is the objective symbol and must house a kindred internal order of things. To understand Veda, we must seize this vedic parallelism and distinguish the Cosmic gradations to which it leads

| Principle | World (Puranic) |
|---|---|
| 1. Pure Existence (सत्) | world of the highest truth of being (सत्यलोक) |
| 2. Pure Consciousness (चित्) | world of infinite will or conscious force (तपलोक) |
| 3. Pure Bliss (आनंद) | world of creative delight of existence (जनलोक) |
| 4. Knowledge or Truth (विज्ञान) | world of the Vastness (महर्लोक) |
| 5. Mind | world of Light (स्वर) |
| 6. Life (nervous being) | world fo various becoming (भुवः) |
| 7. Matter | The material world (भूः) |

हे सर्व थोड्या विस्ताराने मांडण्याचे कारण हेच की भारतीय संस्कृतीचे बीज ह्या वैश्विक रचनेवर व त्या ज्ञानावर अवलंबून आहे. ह्या संदर्भात वैदिक सृष्टि उत्पत्ति रहस्य जाणणे आवश्यक आहे.

महत्त्वाचा फरक हा आहे की ह्या विश्वाच्या रचनेमध्ये जो 'व्यक्त' व 'अव्यक्त' असा भाग (manifest, unmanifest) (पुरुषसुक्त) व त्यातला जो व्यापार व व्यवहार 'जन्म, मृत्यू व पुनर्जन्म' ह्या न्यायाने चालू आहे, त्याचे संपूर्ण रचनात्मक व संकल्पनायुक्त असे स्वरुप वेदांनी मांडलेले आहे. त्याची पुरेपूर यथायोग्य जाणीव व महत्त्व आजचे जग व विद्वान जाणत नाहीत - मानत नाहीत किंवा 'ज्ञानाची' ही दिशा मानत नाहीत.

**उध्वस्त ज्ञान परंपरा :**

ह्या अज्ञानाच्या मुळाशी एक फार मोठे कारण आहे. दर ६०/७० वर्षांनी जवळजवळ नवीन पिढी जी ह्या पृथ्वीवर अस्तित्वात येते, तिला ह्या वैश्विक रचनेचा व संकल्पनेचा पसारा सांगणारी 'सनातन शैक्षणिक पद्धति' व 'जीवन व्यवहार' हा 'उध्वस्त' करण्यात आला आहे. हे काम त्यातला काही भाग परकीय आक्रमक धर्म व संस्कृतिमार्फत व काही हिंदू शरणार्थी प्रजाजनामार्फत. आजही ही विध्वंसक क्रिया अविरतपणे प्रचलित राज्यसंस्थेमार्फत चालू आहे - भारतातच !! अगोदर वरती वर्णिलेले चित्र जरी संपूर्ण नसले तरी आपल्याला ज्या विषयाचा विशेष अभ्यास करावयाचा आहे, त्याला सध्यातरी पुरे पडेल असे वाटते.

आता या वेदिक ज्ञानाची जाणीव व अनुभूती युगान्तापर्यंत मानवी जीवाच्या अस्तित्वापर्यंत ज्या ज्या साधनांनी होते आहे. त्याचा आढावा व नाती तपासू या.

**संस्कृतीची साधने :**

ह्या साधनात 'भाषेचा' भागही मोठा आहे. आता भाषा म्हणजे काय? शब्द, लिपी, भाषेची रचना, अर्थ, उच्चार ह्यांची रचना, उगम, नाती कशी ती पाहूया. ज्ञानाचे

'साधन' पाहूया.

देववाणी संस्कृत का?

**मंत्रशास्त्र :**

स.कृ. देवधर यांच्या 'गायत्री मंत्र आणि उपासना' या लहानशा पुस्तकात पाणिनी व पृथ्वधिर शेष (तोही वैय्याकरणी) आहे त्याची एक कथा आहे. त्यात 'को भवेत' ह्या प्रश्नाच्या ऐवजी 'कोर्भवेत' असा उच्चार पाणिनीकडून होतो व त्याला 'सपोऽहम्' असे शेषाचे उत्तर - 'र' फार विरहीत व त्याचे समर्थन 'तव मुखात प्रथमागत: स: । पुनरुच्चारणेन । किम । असे शेषाचे मिश्किल उत्तर हा किस्सा आहे.

पण, त्यानंतर पाणिनीच्या 'ध्यानावस्थेत' भगवान शिवशंकराचे आगमन व 'शिवसूत्रांचे दान' हा प्रसंग सांगितला आहे. ही 'चौदा शिवसूत्रे' ह्यात, सर्व मूळ स्वर व व्यंजने यांचा समावेश आहे.यावरच पाणिनीने 'व्याकरण पंथी' 'अष्टाध्यायी' रचली आणि भट्टोजी दीक्षीत यांनी 'सिद्धांत कौमुदी' ही टीका लिहिली. ही झाली व्याकरण व मूळ नाद यांची कथा.

भगवान शंकराने डमरूवर वाजवून जे 'नाद' निर्माण झाले त्यावर आधारलेली शिवसूत्रे अशी - (संदर्भ - आनंद तांडव)

''अइउण् । ऋलृक् एओङ् । एओच् । हयवट् । लण् । अमङ्णनम् । झभञ् । घढधष् । जबगडदश् । खफछठथचटतव् । कपय् । शषसर । हल ॥''




(चित्र : ३)

ह्या सर्व कथानकाचा सारांश हा की भाषेची उत्पती ही Cosmic Sound वैश्विक नाद ह्या मूळ स्त्रोतातून व त्याचा उपयोग किंवा स्वीकार व रचना मानवी कंठ, ओठ, नाक, जिव्हा, मूर्धा वगैरेच्या आघात, धात, प्रघात ह्या पद्धतीने होतात. हा सर्व विषय तैतरीय उपनिषदात 'शिक्षा' ह्या अध्यायात पहायला मिळेल.

हा सर्व भाग आपल्या विद्वानांना बऱ्याच प्रमाणात ज्ञात आहे यात शंका नाही. पण काय माहित नाही हे बघूया. वेदिक ज्ञान हे 'देववाणी संस्कृत'च्या माध्यमातून जरूर आहे, पण त्याचा बोध होण्यासाठी वेदविद्या व मंत्रशास्त्र अवगत हवे.

कै. अप्रबुद्ध यांच्या 'ब्राह्मण: एक राष्ट्रीय प्रश्न' ह्या निबंधात ब्राह्मण हे आपल्या अधिकार क्षेत्रातून का ढळले याची मीमांसा करताना ते लिहितात -

''भारत वर्षात ब्राह्मणांनी जे स्थान मिळवले ते एक विशेष शास्त्र जिवंत ठेवून व त्याकरिता अनन्य साधारण त्याग करून. हे शास्त्र म्हणजे 'वेदविद्या'... भारतीय युद्धानंतर वेदशास्त्राची प्रचिती देणारे लोक दिवसेंदिवस नाहीसे झाले, म्हणजे त्यानंतर ब्राह्मणांनी वेद मात्र जपून ठेवले. वेदविद्या जवळजवळ नष्टच झाली. याकारणाने ब्राह्मणांचे महत्त्व नाहीसे झाले.''

ह्या 'वेदविद्या' - उपनिषदात विशेषत: छांदोग्य उपनिषदात वर्णिलेल्या आहेत. त्यांची काही नावे अशी - 'मधुविद्या, उपकोशला, सत्यकाम, वैश्वानर, पंचाग्नि, संवर्ग, उद्गीथ, भृग, दहर, शांडिल्य, उद्दालक, मैत्रेयी, भूमा, पर्यंक वगैरे. ह्यावर 'The Thirty Two Vidyas' हे नारायणस्वामी अय्यर ह्यांचे पुस्तक 'The Adyar Library and Research Centre ह्यानी १९१६ साली प्रथम छापले आहे.

ह्या विद्यांची साधना व शिकवणूक मानवी मनाच्यामार्फत व कल्पनाशक्तीच्या जोरावर 'डायरेक्ट' कॉंशसनेसमध्ये गुणात्मक अतींद्रिय शक्तिसामर्थ्य निर्माण करणे अशा पद्धतीची आहे, असे माझे म्हणणे आहे.

**गणेशविद्या**

यापेक्षा जरा निराळ्या मार्गाचा विचार करूया. अथर्वण ऋषीने रचलेल्या 'गणपती अथर्वशीर्ष' ह्या संहितेमध्ये 'गणपती ह्या देवतेचे वर्णन -

'त्वं देहत्रयातीत; कालत्रयातीत:, गुणत्रयातीत: अश्या abstract आणि ह्या नाशिवंत, कालबद्ध, गुणबद्ध, विश्वाच्या पलीकडल्या अवस्थाचे वर्णन केल्यावर - त्वं मूलाधार स्थितोसि नित्यम् - सांगताना - चक्रसाधनेतल्या स्थानांचा उल्लेख केला आहे. हा योग व तंत्राचा भाग आहे.

याचाच अर्थ विश्वाबाहेरच्या स्थितींचा व मानवी शरीरांतर्गत स्थानांच्या अवस्थेचे वर्णन येथे केलेले आढळते. 'मानवी फॉर्म'ने विश्वरचनेचा व विश्वाबाहेरील स्थानांचा हा 'जोडसंबंध' का बरे सांगण्यात येत आहे? काय आहे हा वैश्विक 'लॉ' (Law)?

त्याचबरोबर, 'गकार: पूर्वरूपम् । अकारो मध्यमरूपम अनुस्वारश्चान्त्यरूपम । बिन्दुरुत्तररूपम । नाद:सन्धानम् । संहितासंधि: । सैषा गणेशविद्या । गणकऋषि: । निचृद्गायत्रीछंद: । गणपतिर्देवता । ॐ गं गणपतये नम: ॥७॥'

हा साधनेचा मंत्र सांगितला आहे. त्या मंत्राची पूर्ण रचना इथे आहे. तिची बांधणी 'गं' ह्या संस्कृत (नादावर) शब्दावर आधारलेली आहे. ग् हे व्यंजन मानवी शरीराच्या २६ व्या मणक्याशी संबंधित आहे. तिथे ह्या ग् व्यंजनाच्या उच्चाराचा व होणाऱ्या स्पंदांचा संबंध आहे.

चित्र नं. ४ हे स्पंद अतिसूक्ष्म व जड जाणिवेच्या पलीकडचे आहेत हे लक्षात ठेवायला हवे.



(चित्र : ४)

ह्यातले दोन शब्द महत्त्वाचे (१) बिंदु (२) नादानुसंधानम् ह्यांचे 'मंत्रसाधनेच्या' दृष्टीने अर्थ लावावयास हवेत. 'बिंदु' ही संकल्पना म्हणजे एक सूक्ष्म गवाक्ष (खिडकी, झडप) की जी 'व्यक्त' व 'अव्यक्त' जगाची सीमा दाखवते व ह्या दोन जगातल्या व्यवहाराचा सूक्ष्म संधि मार्ग ठरते आणि ह्या दोन जगात जे एका बाजूला 'जड स्पंदनाचे जग' आहे व 'दुसऱ्या अव्यक्त जगात जे अज्ञात, गूढ, अतिसूक्ष्म स्पंदन आहे त्यातल्या 'नादांचे' संधान साधण्याची कला नादानुसंधानम्ने स्पष्ट होते.

## दुर्गा शक्ती साधना कुंजिका

तसेच, दुर्गासाधनेत कुंजिकास्तोत्रात 'जो नवार्णमंत्र'

'ऐं, ऱ्हीं, क्लीं, चामुंडाय, विच्चे' सांगितला आहे, त्यामध्येही, जी संस्कृतभाषेतील शब्दयोजना आहे ती एका नाद समुच्चयाची एकत्रित साधना दर्शवीत आहे. 'कुंजिका' म्हणजे किल्ली. याचा अर्थ हा दरवाजा, गवाक्ष, खिडकी, झपड ही एक तऱ्हेचा 'Voice Lock' ने निबद्ध आहे.

मग, ही एव्हढी सोपी किल्ली प्रत्येक माणसाला का प्राप्त होत नाही? हाच प्रश्न $E = mc^2$ हा फिजिक्सचा अॅटमबॉम्ब प्राप्त करून देणारा 'सोपा' मंत्र प्रत्येक राष्ट्राला का प्राप्त होत नाही याच श्रेणीचा आहे. पण तुलनेने 'भौतिक विज्ञान शास्त्रावर' श्रद्धा व विश्वास आहे, पण मंत्रशास्त्रावर नाही व त्यावर 'Mysticism' चे पूर्वग्रही अज्ञानी शिक्के आमच्या शिक्षणपद्धतीत, जीवनधारणेत कोंबले व मारले आहेत.

## मंत्राचा अधिकार :

मंत्रशास्त्र फार गहन आहे. ते शुद्ध चारित्र्याचा,

सत्यवर्तनाचा व स्फटिकतुल्य मनाचा आग्रह धरते. 'काया, वाचा व मने' ही त्या शुद्धतेची मागणी क्षेत्रे (fields) आहेत.

त्या अवाढव्य शास्त्राच्या तपशीलात न जाता काही विषयांचा फक्त उल्लेख करतो. 'मंत्र महोदधि' ह्या प्राच्य प्रकाशन, वाराणशी, ह्या ग्रंथाचा संदर्भ देतो. मंत्रसिद्धीसाठी १) भक्ति, २) शुद्धि ३) आसन ४)आचार ५)पंचाग सेवन ६) धारणा ७) दिव्यदेश सेवन ८) प्राणक्रिया ९) मुद्रा १०) तर्पण ११)हवन विषय येतात. त्याचा सखोल अभ्यास व साधना आवश्यक आहे.

मला माहीत आहे की अशा त्रोटक पद्धतीने ह्या 'वेदिक टेक्नॉलॉजी' मधील रहस्ये कोणती आहेत व ती रहस्ये का आहेत याचा परिचय होणार नाही. पण माझ्या अनुभवात व अनुभूतीत जी गोष्ट आली ती मी सांगण्याचा प्रयत्न करतो आहे.

मुख्य म्हणजे ह्या सर्व क्रिया निव्वळ 'शुष्क कर्मकांडाच्या अंगाने' आज ज्ञात आहेत व खरी गुरूकुले व सत्यगुरू आज अगदी अभावानेच मिळतात. शिवाय ह्या साधनेतील 'मर्म' संपादन करण्यासाठी जी शुद्ध जिज्ञासा, डोळस श्रद्धा, शुद्ध मन व शरीर व सतत निखळ श्रम व प्रयत्न हवेत. त्याच्यामध्ये प्रचलित जीवनपद्धतीतील भौतिक उद्दिष्टे, वैज्ञानिक शंका व तर्कपद्धती व एकंदरच भोगवृत्ती आडवी येते व ती घालवण्याचे निष्ठेने प्रयत्न होत नाहीत. समाज व संस्था व विश्वास आज अनुकुल नाहीत. त्यामुळे अत्यंत जिद्दी व स्वतंत्र कल्पनाशक्तीच्या माणसालाच ह्या विद्या हस्तगत करता येतील.

उलट ज्याला misrepresentation म्हणता येईल अशा धर्मसंस्था, संप्रदाय व गुरूकुले आज विकृत, गढुळलेले व बाटलेले प्रतिनिधित्व करत उभे आहेत.

माझा उद्देश हा निंदेचा नसून ह्या संस्थांना व त्यावर विश्वास ठेऊन आपली मान त्यांच्या खांद्यावर ठेऊन 'प्रयत्न' करणाऱ्याला धोक्याचे कंदील दाखविण्याचा हेतू आहे. सध्या राजसत्ता, लोकसत्ता, जीवनव्यवहार, 'जीवन आदर्श', प्रतिकूल आहे. स्वतःला यातून वाचवून एका जिद्दीने व स्वतःच्या चुकीच्या कल्पनांचे, चुकीच्या ज्ञानाचे, वृत्तीचे संभ्रम टाकून स्वतःला आमूलाग्र बदलण्यासाठी प्रयत्नाला तयार असणाऱ्यालाच हा मार्ग व हे वैश्विक सत्य सापडेल असा विश्वास वाटतो.

**पुढील विषय :**

ह्या पुढच्या लेखात आपण जास्त सखोल विचार मांडण्याचा प्रयत्न करू. ह्या भाग्यवान देशात जे काही गुह्य ज्ञान जिवंत आहे त्यात काही वैश्विक योजना आहे असे निश्चितपणे वाटते. पण त्या ज्ञानाच्या संवर्धनासाठी जी अनुकूल समाजरचना व बांधिलकी रहाते ती नष्ट झाली आहे. त्याचाही विचार पुढे करूंया.

**यशवंत साने**

(स्पिरीच्युअल सायन्स सेंटर)

सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन, ठाणे

दूरध्वनी : २५३६८४५०

ई-मेल : yrsane@eth.net

प्रतिक्रियांसाठी

दूरध्वनी

२५४२ ६२७०

# समाज प्रबोधन पत्रिकेतील ग्रंथपरिचय आणि ग्रंथपरीक्षणांची सूची

सूची संकलन : स्मिता सत्यवान सावंत, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

*ग्रंथालयशास्त्राच्या पदवी स्तरावरील अभ्यासात मुक्त विद्यापीठाने सूची वा कात्रण संग्रह बनविणे अनिवार्य केले आहे, असे अनेक प्रकल्प बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात आहेत. समाज प्रबोध पत्रिका या समाज चिंतन व संशोधनात महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या नियतकालिकाने ग्रंथ परिक्षणांसाठी कोणते ग्रंथ स्वीकारले, निवडले हे पाहून त्यांची बनविण्यात आलेली ही सूची. विद्यार्थिनीने घेतलेले कष्ट प्रामाणिक होते. त्यामुळे यात त्रुटी असूनही सूची देत आहोत. या सूचीचा 'दिशा' चे वाचन करणाऱ्या वाचकांना नक्कीच उपयोग होईल. प्रकल्प मुळातून पहावयाचा असल्यास आमचा बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात आहे. - संपादक*

(मागील अंकापासून पुढे सुरू)

टीप : ग्रंथनामाप्रमाणे आधारलेली रचना आहे.

४७. *राजकीय समीक्षा*
**'ट्रान्सफर ऑफ पॉवर'**
व्हॉल्यु. VII (२३ मार्च; २९ जून १९९६)
मनसुर्ग, एन.; मून, पी. हरमॅजेस्टि गव्हर्मेंट
(टिकेकर, श्री.रा.)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७७/७७पृ. ३५५ ते ३५८

४८. *समीक्षा ग्रंथ*
**'ट्रूथ ॲन्ड नॉन-व्हायोलन्स'**
(संपा. महादेवन, टी. के.)
नवी दिल्ली : गांधी शांति प्रतिष्ठान, १९७०
(पळशीकर, वसंत)
सप्रप/मार्च-एप्रिल ७५/६२ पृ. ८९ ते १०१

४९. *वाङ्मयलेख संग्रह*
**'डॉ. केतकर यांचे वाङ्मयविषयक लेख'**
(संपा. खानोलकर, गं.दे.)
मुंबई : मराठी संशोधन मंडळ
(गाडगीळ, पां.वा.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७६/६७पृ. ५५ ते ५७

५०. *समीक्षापर पुस्तक*
**'डिस्टंट नेबर्स'** नायर, कुलदीप
दिल्ली : विकास पब्लिशिंग हाऊस, १९७२
(कर्णिक, व.भ.)
सप्रप/मार्च-एप्रिल ७३/५० पृ. ६२ ते ६५

५१. *कविता संग्रह*
**'डोळे'** गोसावी, राम
(जाधव, वसंत मा.)
सप्रप/मार्च-एप्रिल ७९/८६ पृ. १४७ ते १४९

५२. *समीक्षा ग्रंथ*
**'द कंटेम्पोररी रेलेव्हन्स ऑफ गांधी'**
(संपा. सिन्हा, एम्.पी.)
मुंबई : नचिकेत पब्लिकेशन, १९७०
(पळशीकर, वसंत)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७३/४९ पृ. ६५ ते ८२

५३. *समीक्षा ग्रंथ*
**'द ग्रोथ ऑफ एज्युकेशन ॲन्ड पोलिटिकल डिव्हेलमेंट इन इंडिया'** (१९१८-१९२०)
बसू, अर्पणा
ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९७४
(अंकोलकर, ग.वि.)
सप्रप/जुलै-ऑगस्ट ७४/५८ पृ. ५७ ते ६३

५४. *चरित्र*
**'द जंटल अनर्किस्टस'**
ऑस्टर गार्ड, जिऑफ्री; क्युरेल, मेलविल
ऑक्सफर्ड : क्लॅरेडन प्रेस, १९७१
(पळशीकर, वंसत)
सप्रप/मार्च-एप्रिल ७५/६२ पृ. १२२ ते १३२

५५. *राजकीय समीक्षा*
**'द मॉडर्निटी ऑफ ट्रॅडिशन : पॉलिटीकल डेव्हलेपमेंट इन इंडिया'**
रूडाल्फ, लॉयड आय
न्यूदिल्ली : ओरिएंट लॉगमन लि.
(घोडके, ह.म.)
सप्रप/मार्च-एप्रिल ७८/८० पृ. १२६ ते १२९

५६. *राजकीय समीक्षा*
**'द मॉरल ॲन्ड पोलिटिकल थॉट ऑफ - महात्मा गांधी'**
अय्यर, राघवन
दिल्ली : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९७३
(पळशीकर, वसंत)
सप्रप/मार्च-एप्रिल ७३/६२ पृ. १०२ ते १०३

५७. *मुसलमान प्रश्नाची समीक्षा*
**'द मुस्लिम डायलेमा इन इंडिया'**
बेग, एम.आर.ए.
दिल्ली : विकास प्रकाशन, ७४
(जोशी, रा.भि.)
सप्रप/सप्टेंबर/ऑक्टोबर ७५/६५पृ. ३३०ते३३२

५८. इतिहास
**'द लॉंग आफ्टरनून'** गोलान्ट, विल्यम
विकास प्रकाशन, १९७६
(टिकेकर, अरुण)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ७६/७२पृ. ३९०ते३९३

५९. *सामाजिक समीक्षा*
**'दलितांच्या समस्या'**
(संपा. प्रका. बह्ये, शंकर)
पुणे : समाजविज्ञान ग्रंथालय, ७४
(भोळे, भास्कर लक्ष्मण)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७५/६५पृ. ३१६ते३२०

६०. *समीक्षा*
**'द युनिव्हर्सिटी इन ट्रान्झिशन - फेस स्टडी'**
आल्टबाक, फिलिप, जी.
मुंबई : सिंधु पब्लिकेशन, १९७२
(भागवत, अ.के.)
सप्रप/मार्च-एप्रिल ७३/५० पृ. ६० ते ६२

६१. *संस्कृतीपर समीक्षा ग्रंथ*
**'दि आओ नागाज'** मिल्स, जे.पी.
ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस प्रकाशन, १९७३
(काळदाते, सुधा)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७६/६७ पृ. ५० ते ५२

६२. *राजकीय समीक्षा*
**'दि कॉंग्रेस पार्टी इन राजस्थान : पॉलिटिकल - इंटिग्रेशन ॲन्ड इन्स्टिट्यूशन बिल्डिंग ॲन इंडियन स्टेट'**
सिरसॉन, रिचर्ड
ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९७२
(भोळे, भास्कर लक्ष्मण)
सप्रप/मे-जून ७५/६३ पृ. १८९ ते १९१

६३. *राष्ट्रीय इतिहास*
**'दि क्रायसिस ऑफ इण्डियन युनिटी : १९१७-१९४०'** मूर, आर.जे.
ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, ७४
(साखळकर, एकनाथ)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७५/६५पृ. ३२०ते३२४

६४. *समीक्षा ग्रंथ*
**'दि डायनॉमिक्स ऑफ स्टूडंड ॲजिटेशन्स'**
विश्वयुवक केंद्र
मुंबई : सोमैया पब्लिकेशन प्रा. लि. १९७३
(थोन्टे, विश्वनाथ)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७४/५५ पृ. ८० ते ८१

६५. *अर्थशास्त्र*
**'द्रव्यनीती'** खेर, सी.पं.
कोल्हापूर : महाराष्ट्र ग्रंथभांडार, १९७२
(दोशी, र.रा.)
सप्रप/मार्च-एप्रिल ७३/५० पृ. ६३ ते ६५

६६. *आत्मचरित्र*
**'निरोप घेता...'** परुळेकर, ना.भि.
पुणे : सकाळ प्रकाशन, प्रा.लि.
(गाडगीळ, पां.वा.)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ७६/७२ पृ. ३९३ ते ३९५

६७. *लेखसंग्रह*
**'निवडक परुळेकर'** परुळेकर, ना.भि.
पुणे : सकाळ प्रकाशक, प्रा. लि.
(गाडगीळ, पां.वा.)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ७६/७२ पृ. ३९५ ते ३९६

६८. *कार्यचिकित्सक ग्रंथ*
**'नेहरु : ए स्टडी इन सेक्युलरायझम'**
बालसुब्रम्हण्यम्, एम्.
न्यू दिल्ली : उप्पल पब्लिशिंग हाऊस, १९८०
(आडगावकर, सु.शं.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ८२/१०३ पृ. ६० ते ६१

६९. *नियतकालिक*
**'परीक्षण'**
(संपा. नाफडे, शेखर; प्रका. नाईक, अरुण)
मुंबई : अक्षर प्रतिरूप, ४२, आंबेडकर मार्ग, वडाळा, १९७२)
(भोळे, भास्कर)
सप्रप/मार्च-एप्रिल ७३/५० पृ. ७० ते ७२

७०. *ललितलेख संग्रह*
**'पहाट पाणी'** वैद्य, सरोजिनी
(लोखंडे, शशिकांत)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७६/६७ पृ. ५८ ते ५९

७१. *इतिहास*
**'पुरोहित वर्ग वर्चस्व व भारताचा सामाजिक-इतिहास'** मुरंजन, सु.ख.
वाई : प्राज्ञ पाठशाळा, १९७४
(पाटील, शरद)
सप्रप/मे-जून ७५/६३ पृ. १८२ ते १८९

७२. *कादंबरी*
**'पोखरण'** मेश्राम, केशव
मुंबई : पॉप्युलर प्रकाशन, १९८०
(भावे, निलिमा)
सप्रप/मार्च-एप्रिल ८२/१०४ पृ. १०८ ते १०९

७३. *भारतीय परंपरेची समीक्षा*
**'प्राचीन काव्यशास्त्र आणि रसभाव विचार'**
कंगले, र.पं.
साहित्य संस्कृती मंडळ
(कुरुंदकर, नरहर)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७५/६५ पृ. ३११ ते ३१६

७४. *कथा संग्रह*
**'फिडेल, चे आणि क्रांती'** साधू, अरुण
पुणे : राजहंस प्रकाशन, १९७३
(साक्रीकर, दिनकर)
सप्रप/मे-जून ७४/५७ पृ. ४९ ते ५३

७५. *संकलनात्मक लेख संग्रह*
**'फ्रीडम टू लर्न'** जॉन, व्ही.व्ही.
न्यू दिल्ली : विकास प्रकाशन
(अकोलकर, ग.वि.)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७६/७१ पृ. ३२७ ते ३३०

७६. *व्याख्यान संग्रह*
**'भाकरी आणि स्वातंत्र्य'** प्रधान, ग.प्र.
पुणे : विश्वकर्मा साहित्यालय, टिळक रोड, ३०
(गाडगीळ, पां.वा.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७८/७९ पृ. ४५ ते ४६

७७. *चरित्र*
**'भागवतोत्तम संत एकनाथ'** पेंडसे, शं. दा.
नागपूर : नागपूर प्रकाशन, १९७१
(करंदीकर, वि.रा.)
सप्रप/मार्च-एप्रिल ७३/५० पृ. ५१ ते ५६

७८. *कादंबरी*
**'भागधेय आणि अगोचर'**
खानोलकर, चि.त्र्यं
(जोग, शकुंतला)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७८/८३ पृ. ३५२ ते ३५५

७९. *समीक्षा*
**'भारताचे परराष्ट्रीय धोरण'**
(संपा. दाते, सुनील)
औरंगाबाद : विचार प्रकाशन, ७४
(काकडे, सुरेश)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७५/६५ पृ. ३२४ ते ३२७

८०. *ग्रामीण बँकांची समीक्षा*
**'भारतातील ग्रामीण बँक व्यवसाय'**
(संपा. देसाई, मुतालिक; दास्ताने, संतोष रा.)
पुणे : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, १९८१
(गुराम, अशोक)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ८१/१०१ पृ. ३१९ ते ३२०

८१. *व्याख्यान संग्रह*
**'भारतीय राजनीति का नया मोड'**
लिमये, मधू
नवी दिल्ली : समता पुस्तकमाला, १९७९
(थत्ते, यदुनाथ)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ८२/१०३ पृ. ५५ ते ५६

८२. *कवितासंग्रह*
**'भावगंधा'** बसाखेत्रे, राम
नागपूर : वसुधा प्रकाशन, १९८१
(लांजेवार, ज्योती)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ८२/१०३ पृ. ६२

८३. *इंग्रजी ग्रंथ*
**'भूतान : ड्रॅगन किंडम इन क्राइसिस'**
रूस्तमजी, नरी
ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९७८
(गाडगीळ, पां.वा.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७९/८५ पृ. ६६ ते ६८

८४. *वार्षिक*
**'मराठवाडा संशोधन मंडळ-वार्षिक : १९७४-१९७५'**
(संपा.पंडित जोशी, सुधाकर गणपतीशास्त्री)
राधाकृष्ण रामचंद्र प्रकाशन
(करंदीकर, वि.रा.)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७८/८३ पृ. ३४८ ते ३५२

८५. *समीक्षा ग्रंथ*
**'मराठी कथा : उगम आणि विकास'**
शेवडे, इंदुमती
मुंबई : सोमैया पब्लिकेशन्स, १९७३
(कुलकर्णी, गो.म.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७४/५५ पृ. ६५ ते ७२

८६. *चरित्र*
**'महात्मा गांधी'** नंदा, बी.आर.
मुंबई : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९५८
(गाडगीळ, पां.वा.)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ८१/१०२ पृ. ३१० ते ३१३

८७. *चरित्र*
**'महात्मा गांधी-पोलिटिकल सेंट अ‍ॅन्ड-अनआर्म्ड प्रॉफेट'** कीर, धनंजय
मुंबई : पॉप्युलर प्रकाशन, १९७३
(पळशीकर, वसंत)
सप्रप/मार्च-एप्रिल ७३/६२ पृ. १०७ ते ११७

८८. *समीक्षा ग्रंथ*
**'महाराष्ट्रा : एक प्रोफायल (व्ही.एस्.खांडेकर फेलॉक्टिटेशन व्होल्युम.)'**
(संपा. भागवत, अ.के.)
पुणे : इंटरनॅशनल बुक डेपो, १९७७
(कामत, अ.रा.)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ७७/७८ पृ. ४१६ ते ४२०

८९. *उद्योग समीक्षा*
**'महाराष्ट्रातील ऊस उद्योग प्रगतीचा आराखडा'** मोहिते, यशवंतराव
पुणे : भारती विद्यापी, एरंडणे
(तुपे, सु.दा.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७६/७७ पृ. ४७ ते ५०

९०. *सामाजिक समीक्षा*
**'मातावळ'** गोडसे, द.ग.
मुंबई : पॉप्युलर प्रकाशन
(घोडके, ह.म.)
सपप्र/जानेवारी-फेब्रुवारी ८२/१०३ पृ. ५६ ते ५७

९१. *चरित्र वाङ्मय*
**'माधवराव पटवर्धन - वाङ्मय दर्शन'**
चुनेकर, स.रा.
मुंबई : मौज प्रकाशन, १९७३
(गोखले, द.न.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ५४/५५ पृ. ७२ ते ७८

९२. *समीक्षासूची*
**'मूल्यवेध'** पानतावणे, गंगाधर
अस्मितादर्श प्रकाशन, ७४
(जाधव, रा.ग.)
सप्रप/जुलै-ऑगस्ट ७५/६४ पृ. २५१

९३ *संकीर्ण लेख संग्रह*
**'यात्रा'** करंदकर, नरहर
नांदेड : शारदा प्रकाशन, १९७७
(इनामदार, चि.शं.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७९/८५ पृ. ६० ते ६३)

९४. *कथासंग्रह*
**'रक्तपंख'** चिंचाळकर, वसंत
नागपूर : नागपूर प्रकाशन, सीतावर्डी, १२
(कोत्तापल्ले, नागनाथ)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७६/७१ पृ. ३२० ते ३२३

९५. *कादंबरी*
**'रघुनाथाची बखर'** जोशी, श्री.ज.
मॅजेस्टिक (मोटे, कृष्णाबाई)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७७/७७ पृ. ३५८ ते ३६२

९६. *निबंध संग्रह*
**'राजनितिविषयक निबंध'**
विष्णूबावा ब्रम्हचारी ऊर्फ गोखले, विष्णू भिकाजी
मुंबई : संशोधन मंडळ प्रकाशन, १९७५
(भोळे, भास्कर लक्ष्मण)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ७५/६६ पृ. ४०६ ते ४०७

९७. *गौरवग्रंथ*
**'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ'**
(संपा. साळुंखे, पी.बी.)
मुंबई: प्रकाशक महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, सचिवालय, ३२
(गाडगीळ, पां.वा.)
सप्रप/मार्च-एप्रिल ७८/८० पृ. १२४ ते १२५

९८. *विचार समीक्षा*
**'रायटिंग अॅन्ड स्पिचेस ऑफ प्रो.डी.आर. गाडगीळ ऑन को.ऑप.'**
गाडगीळ, ध.रा.
गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अॅन्ड इकॉनॉमिक्स
(गाडगीळ, पां.वा.)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७६/७१ पृ. ३२३ ते ३२५

९९. *समीक्षा ग्रंथ*
**'राष्ट्रीय व भावनात्मक एकता'**
पुराणिक, प्र.द.
पुणे : साधना प्रकाशन, १९७१
(बापट, भा.रा.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७४/५५ पृ. ८१ ते ८३

१००. *शैक्षणिक समीक्षा*
**'लिट्री अॅन्ड एज्युकेशनल इनरोलमेंट - अमंग ऑफ द शेड्युलकास्टेल ऑफ महाराष्ट्र'**
चिटणीस, सुमा
मुंबई : टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स,७४
(कामत, अ.रा.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७६/६७ पृ. ४५ ते ४७

१०१ *चरित्र*
**'व्यक्तिवेध'** पाध्ये, प्रभाकर
पुणे : केसरी प्रकाशन, १९७३
(गोखले, द.न.)
सप्रप/जुलै-ऑगस्ट ७४/५८ पृ. ६३ ते ६६

१०२ *कथासंग्रह*
**'विदेही'** राजाध्यक्ष, विजया
मुंबई : मौज प्रकाशन गृह, १९७२
(जोग, ल.ग.)
सप्रप/मार्च-एप्रिल ७३/५० पृ. ६५ ते ६८

१०३ *लेखसंग्रह*
**'विवेकाची गाठी'** नातू, म.गं.
नागपूर : अमेय प्रकाशन, १९७७
(बापट, भा.रा.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७९/८५ पृ. ६८ ते ६९

१०४ *पत्रसंग्रहात्मक ग्रंथ*
**'विश्वब्ध शारदा'** खंड -२
(प्रका. ह.वि. मोटे प्रकाशन ) मुंबई, १४
(नाडकर्णी, ज्ञानेश्वर)
सप्रप/जुलै-ऑगस्ट ७५/६४ पृ. २५३ ते २५४

१०५ *कवितासंग्रह*
**'वृंदगान'** शिंदे, फ.मु.
औरंगाबाद : प्रोग्रेसिव को-ऑफ सोसायटी लि. अंजुरीबाग
(भोळे, भास्कर लक्ष्मण)
सपप्र/मार्च-एप्रिल ७९/८६ पृ. १४९ ते १५१

१०६ *कादंबरी*
**'सातसक्कं त्रेचाळिस'** नगरकर, किरण
मौज, १९७३ (भोळे, भास्कर)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ७६/७२ पृ. ३९६ ते ३९९

१०७ *चरित्र*
**'साने गुरुजींची जीवनगाथा'**
मंगळवेढेकर, राजा
साधना प्रकाशन
(प्रधान, ग.प्र.)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७६/७१ पृ. ३१७ ते ३२०

१०८ *चरित्र*
**'सामान्यातील असामान्य'**
पाटील, पंढरीनाथ; (वक्ता पाटील, आशादेवी)
वांद्रे : १०५ सहकारी वसाहत, ७५
(काणेकर, अनंत)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७५/६५ पृ. ३३२ ते ३३३

१०९ *कवितासंग्रह*
**'स्वस्तिक'** सावंत, वसंत
मुंबई : पॉप्युलर प्रकाशन, १९७३
(शेळके, शांता ज.)
सप्रप/मे-जून ७४/५७ पृ. ४७ ते ४९

११० *कथासमीक्षा*
**'स्वातंत्र्योत्तर गोमंतकीय मराठी कथा'**
घवी, रवींद्र; (प्रका. रासकर, श्रीकांत)
पणजी : गोमंतक साहित्यसेवक मंडळ(सूर्यदा)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७९/८५ पृ. ७३ ते ७४

१११ *समीक्षात्मक लेख*
**'स्वान्त'** शिंदे, फ.मु.
औरंगाबाद : प्रतिमा प्रकाशन
(घवी, रवीन्द्र)
सप्रप/मे-जून ७५/६३ पृ. १९९ ते २०१

११२. *टीकालेख संग्रह*
**'स्वाद आणि चिकित्सा'** मनोहर, यशवंत
नागपूर : धनंजय प्रकाशन, १९७८
(इनामनदार, एस्.डी.)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७८/८३ पृ. ३४२ ते ३४५

११३. *चरित्र*
**'सिव्हिल डिसओबिडियन्स अॅन्ड इंडियनन ट्रॅडिशन'** धर्मपाल
वाराणसी : सर्वसेवा संघ प्रकाशन, १९७१
(पळशीकर, वसंत)
सप्रप/मार्च-एप्रिल ७५/६२ पृ. ११८ ते १२२

११४. *चरित्र*
**'श्री गाडगेमहाराज'** दांडेकर, गो.नी.
मुंबई : मॅजेस्टिक बुक स्टॉल
(भोसले, एस्. एस्.)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ७७/७८ पृ. ४२० ते ४२३

११५. *चरित्र*
**'सेनापती'** नवरे, श्रीपाद शंकर
मुंबई : सेनापती बापट स्मारक समिती,
मौज प्रकाशन गृह
(गाडगीळ, पां.वा.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७८/७९ पृ. ४६ ते ४८

११६. *इंग्रजी गौरव ग्रंथ*
**'से नॉट दि स्ट्रगल : ए. डी. गोरवाला'** २री आ.
(संपा. पटेल, एच. एम.)
मुंबई : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस
(गाडगीळ, पां.वा.)
सप्रप/मे-जून ७९/८७ पृ. २१५ ते २२०

११७. *लेखसंग्रह*
**'संस्कृति'** कर्वे, इरावती
पुणे : देशमुख आणि कंपनी, १९७२
(भट, गो. के.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७६/६७ पृ. ५२ ते ५५

११८. *कादंबरी*
**'हकीकत आणि जटायू'**
मेश्राम, केशव
मुंबई : पी.पी. एच. बुक स्टॉल
(बुलबुले, प्रल्हाद)
सप्रप/मे-जून ७५/६३ पृ. १९२ ते १९४

११९. *चरित्र*
**'ज्ञाननिधीच्या सान्निध्यात'** केळकर, रवींद्र
व्होरा अॅन्ड कंपनी पब्लिशर्स प्रा.लि., १९७०
(सोनावणे, सुभाष)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७७/७७पृ. ३६२ ते ३६५

१२०. *समीक्षा*
**'ज्ञानेश्वरांचे श्रोतृसंवाद'** कुलकर्णी, द.भि.
नागपूर : अमेय प्रकाशन (नातू, म. गं.)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ७७/७८ पृ. ४१३ ते ४१६

(समाप्त)

# प्रवीण दवणे यांना आलेले पत्र ...

*आमच्या जोशी - बेडेकर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व मराठीतील ख्यातनाम साहित्यिक प्रा. प्रवीण दवणे यांना त्यांचे 'सावर रे' सदर वाचणाऱ्या एका कैद्याने पाठवलेले हे पत्र जसेच्या तसे प्रसिद्ध करीत आहोत. या लेखनाला असणारे सामाजिक मूल्य फार महत्त्वाचे आहे. - संपादक*

शिवाजी साळुंके
कैदी क्र. ३४९५
पैठण खुले कारागृह
नाथ-नगर ४३११०८
दि. १२/२/२००५

आदरणीय सर,

अभिवादन ... जन्मठेपेचा वैशाख वणवा वाट्याला आला तेव्हा काही काळा पुरता उन्मळून पडलो होतो. संवेदनाहिनांच्या वस्तीत संवेदनांशी नातं सांगणारं तसाच काळीज घेऊन या वातावरणात प्रवेश केला; तेव्हा संवादच हरवला. इथे संवाद कोणाशी व कसा करावा? कारण इथल्यांच्या संवादाची भाषाच जगावेगळी. गजाआडचं सर्वच जग जगावेगळं. तशी संवादाची भाषाही. व त्या भाशेपी मी अपरिचित. अशावेळी कोण आपल्याशी बोलेल? अशा वेळी तुम्ही आमच्या बॅरकच्या वर्गावर आलात व म्हणालात ''सावर रे !'' व सावरलो. तुम्ही बोलत राहिलात; अन् मी सावरत राहोलो ... नव्हे जगत राहिलो... तुम्ही एकदा म्हणालात ''जगातली कोणतीही... अगदी यशाच्या सर्वोच्च शिखरावरची कोणतीही व्यक्ती आठवा. त्या शिखराचा उगम एखाद्या दंशातूनच असतो. केंव्हातरी चरित्रातून, केंव्हा तरी प्रत्यक्षातून अशा बेटावरचे आपणही प्रवासी व्हावे. आपल्या स्वयंकेंद्रित, गुळगुळीत, तुपट सुखीपणावर चरे ओढावेत. बाणाच्या टोकाने काळजावर मुळाक्षरे लिहण्याचा प्रयत्न करावा. अशा वेळी ओघळणाऱ्या जखमेतून आपल्या हातून काहीतरी वेगळ निर्माण होईल. ते कीती उत्तुंग हे नंतर; पण ती जखम आपल्याला चेहरा देईल'' व मला माझा असा चेहरा तुम्ही तीन व्यक्तींनी दिला. प्रवीण दवणे, रविंद्रनाथ टागोर आणि नीला सत्यनारायण, प्रधान सचिव गृहविभाग, मी सावरलो... व जखमांनी चेहरा दिला. कीती उत्तुंग हे नंतर पण माझ 'आत्मझड' विशाखा काव्य पुरस्कार २००४ व राज्य साहित्य संस्कृती मंडळाच 'यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार' प्राप्त ठरू शकला... पुरस्कार फक्त नाव देतात... पण तुम्ही अंतरीचे भाव समृद्ध केले. हे माझ्यासाठी महत्त्वाचं म्हणून हे एकलव्याचे कृतज्ञता पत्र चरणी सविनय...

माझे धुळ्याचे मित्र (हा माणूस कोणत्याही वयोगटाचा मित्र असतो. माझाही.) ज्यांच्यावर तुम्ही लोकसत्ता मध्ये 'टवटवीत-वार्धक्य' लिहलं होत ते रावसाहेब गरूड मी पॅरोल रजेवर गेलो की म्हणायचे 'शिवाजी, तू दवणे सरांना पत्र लिही' तुमचा पत्ताही त्यांनी पत्रात लिहून पाठवला होता. त्यांना म्हटलं, मी कधीतरी सरांना पत्र लिहीनच. पण... सरांना पत्र लिहिण्या इतकी पात्रता तर मला येऊ द्या... ( ती अजूनही नाही म्हणा) व किमान पात्रता तरी आहे असा आज मनात कौल दिला... व लिहायला बसलो. बॅरेक मधले माझे सह कैदी नव्हे जिवंत मढे कैदी चादरीचे पांढरे कफन ओढून केदी दोच्या ३ x ६च्या निळ्या तिरडीवर पहुडलेत. आता रात्रीचे २ वाजताहेत... मी ही काही काळ मरतो आता. उद्याच्या जगण्यासाठी... इतका वेळ जागलो तुम्हाला प्रार्थण्यासाठी. प्रार्थना चालूच होती तुमची. ती फळाला येईल तो मी माझा सुदीन समजेन... देव पावलाच पाहिजे अस नाही... कारण तो पावला-पावला वर सोबत असतोच...तोल... हा तोल जाऊ लागला की कोणत्याही पाना-पानातून आवाज उमटतोच.. सावर रे! व मी सावरतो... हे काय कमी आहे, नाही का? मग 'पत्र द्या' हे म्हणण्यात काय अर्थ आहे नाही का?

सावरलेला... तुमचा...
**शिवाजी साळुंके**
पैठण कारागृह

# पालक, विद्यार्थी, शिक्षक समन्वय - एक समस्या

*पालक विद्यार्थी व शिक्षण यांच्यात समन्वय नसेल तर शिक्षण प्रक्रियेत परिपूर्णता येणार नाही. त्या दृष्टिने काही विचार.- संपादक*

शिक्षणाच्या अनेक व्याख्या करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा शारीरिक, भावनिक, मानसिक, बौद्धिक, सर्वांगीण विकास ही प्रमुख आणि अतिशय महत्त्वाची व्याख्या आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे कार्य शाळेमध्ये शिक्षकांद्वारे प्रामुख्याने होत असते. ह्यालाच आपण त्या विद्यार्थ्यांचे औपचरिक शिक्षण म्हणत असतो. ज्ञानदान किंवा विविध विषयांची माहिती देण्याबरोबरच शिक्षिक प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या विद्यार्थ्यांच्या संवेदनशील मनावर नैतिक मूल्यांचे संस्कार ही करत असतात. ज्यातून देशाचा सुजाण, सुसंस्कृत आणि जबाबदार भावी नागरिक तयार होत असतो. हे शिक्षकांचे कार्य अनन्यसाधारण महत्त्वाचे घडविणारे 'शिल्पकार' असा सार्थ गौरव केला जातो.

त्याच बरोबर विद्यार्थी हा समाजाचा देखील एक घटक असल्यामुळे त्याचा देखील कळत-नकळत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम विद्यीर्थ्यांच्या जडणघडणीवर होत असतो. विशेषतः विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला किंवा गृहसंस्कारांना फार महत्त्व आहे. त्यालाच आपण विद्यार्थ्यांचे अनौपचारिक शिक्षण म्हणत असतो. औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण अशी विभागणी आपण सोईसाठी करत असलो तरी विद्यार्थ्यांच्या बाबतीत हे त्याचे दोन्ही प्रकारचे शिक्षण एकाच वेळी होत असते, म्हणून ह्या दोन्ही प्रकारच्या शिक्षणामध्ये एकसूत्रता किंवा एकवाक्यता असणे अत्यावश्यक आहे. ह्या दोन्ही प्रकारच्या शिक्षणांनी एकमेकांना कुठेही छेद देता कामा नये. हे पाहणे शिक्षक आणि पालक दोघांचेही कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांचे शिक्षण पर्यायाने त्याच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास हे शाळा म्हणजे शिक्षक आणि घर म्हणजे विद्यार्थ्यांचे आईवडील किंवा पालक ह्यांची सामुदायिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांची शिक्षणातील किंवा एकंदरीतच जीवनातील प्रगती हे दोघांचेही उत्तरदायित्व आहे. त्याची जबाबदारी टाळून किंवा एकमेकांवर ढकलून चालणारे नाही. त्यासाठी शिक्षक आणि पालक ह्यांमध्ये समन्वय असणे अत्यंत गरजेचे आहे. तरच आपण शिक्षणाचा केंद्रबिंदू जो विद्यार्थी त्याचे अधिकाधिक हित साध्य होणार आहे.

परंतु प्रत्यक्ष व्यवहारामध्ये आपल्याला काय चित्र दिसते? पालक, शिक्षक आणि विद्यार्थी ह्या तीन घटकांमध्ये परस्पर समन्वय दिसतो का ? कुठल्याही शाळेतील पालक-शिक्षक संघटनेच्या सहविचार सभेला उपस्थित रहा. वरील प्रश्नाचे उत्तर आपल्याला आपोआपच मिळते. प्रत्येक जण आपली जबाबदारी अमान्य करून दुसऱ्यावर ढकलण्याचा प्रयत्न करत असतो. जसे कांही चेंडू विरुद्ध कोर्टमध्ये ढकलण्याचा प्रयत्न करत असतो. जणू तो खेळच चालला आहे, असे का घडते? परस्पर समन्वयाचा अभाव. प्रत्येकाने आपली जबाबदारी जाणून घेऊन आपण आपले कर्तव्य प्रामाणिकपणे कुचराई न करता पार पाडतो का, ह्याचा अंतर्मुख होऊन विचार करणे आवश्यक आहे.

पालकांना असे वाटते की, आपण आपल्या पाल्याला शाळेत घातले आणि त्याला वह्या, पुस्तके की

इतर आवश्यक सुविधा पुरविल्या की आपली जबाबदारी संपली, मग पाल्याच्या शिक्षणाची जबाबदारी पूर्णपणे शाळेची म्हणजेच शिक्षकांची आहे. काही वेळा आईवडिल दोघेही पालक नोकरी करणारे असतात. ते आपल्या मुलांच्या अभ्यासाकडे इच्छा असूनही काही वेळा लक्ष देऊ शकत नाहीत. मग त्याची भरपाई म्हणून ते मुलांना कुठल्या तरी क्लासला घालतात आणि आपल्या जबाबदारीतून मुक्त झाल्याचे खोटे समाधान मिळवितात. वास्तविक विद्यार्थ्यांचा अभ्यास पालकांनी घ्यावा अशी अपेक्षा कुठलाही शिक्षक ठेवणार नाही. पालक सुशिक्षित असतील आणि आपल्या मुलांच्या शंकांचे, अडचणींचे त्यांनी निरसन केले त्यांना काही उपयुक्त मार्गदर्शन केले तर ते स्वागतार्हच आहे. गृहपाठ करण्यामध्ये पालकांनी आपल्या पाल्यांना मदत करावी, असे मुळीच अपेक्षित नाही. परंतु कित्येकदा पालकांना आपला पाल्य कोणत्या इयत्तेत किंवा तुकडीत आहे हे देखील माहीत नसते हे चित्र खचितच निराशजनक आहे. आईवडीलांनी आपल्या मुलांना आज कोणत्या शिक्षकांनी काय शिकवले, काय अभ्यास दिला ह्या विषयी विचारले तरी आपल्य पालकांचे आपल्याकडे आणि आपल्या अभ्यासकडे लक्ष आहे हे जाणवते. आणि त्याचा निश्चितच चांगला परिणाम होतो. मुलांना पालकांनी आपल्या समोर अभ्यास करावयाला बसविले तर मुले पालकांच्या धाकाने अनिच्छतेने का होईना अभ्यास करतात. काही ना काही लेखन वाचन पाठांतर करतात असा अनुभव आहे. ज्याला Supervised Study (पर्यवेक्षित अभ्यास) म्हणतात, तो ह्याहून वेगळा असतो का?

आणि अभ्यासापेक्षाही महत्वाचे म्हणजे पालक आपल्या पाल्यांवर जे नीतीमत्तेचे संस्कार करू शकतात. ते अधिक महत्त्वाचे आहेत. शाळेमध्ये विद्यार्थी शिक्षकांच्या सहवासात फार तर पाच-सहा तासच असतो. उरलेला वेळ विद्यार्थी आपल्या घरी आपल्या पालकांच्या सहवासात असतो. साहजिकच पालकांच्या वर्तनाचा मुलांच्या चारित्र्यावर, वर्तणुकीवर होणार कळत नकळत परिणाम शिक्षकांच्या वर्तनाच्या परिणामापेक्षा अधिक प्रभावशाली आणि खोलवर ठसा उमटविणारा असतो. विद्यार्थी अनुकरणप्रिय असतात आणि संवेदनाक्षम असतात. ह्याचे भान पालकांनी ठेवले पाहिजे. त्यांचे वागणे बोलणे आदर्श असले पाहिजे, विचार, उच्चार आणि आचार ह्यामध्ये एकवाक्यता असली पाहिजे. बरेच वेळा पालक आपल्या पाल्यांशी शिक्षकांबद्दल बोलताना त्यांचा एकेरी उल्लेख करतात किंवा त्यांच्याबद्दल अनुदाराचे उद्‌गार काढतात. मग विद्यार्थ्यांच्या मनात आपल्या शिक्षकांबद्दल आदरभाव कसा निर्माण होणार? शाळेत 'नेहमी खरे बोलावे' वगैरे सुविचार सांगितले जातात. परंतु पालक जर पदोपदी कारणांवाचून खोटे बोलत असतील, काही वेळा आपल्या पाल्यांनाही खोटे बोलायला भाग पाडत असतील तर शाळेमधील मूल्यशिक्षण या विषयाची ग्रेड मिळविण्यापुरतेच मर्यादित होईल आणि इतर विषयांप्रमाणे परीक्षेला असलेला तो एक विषय एवढेच त्याचे महत्त्व राहील. पालक स्वतःच व्यसनी असतील तर ते आपल्या पाल्यांना 'व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम' काय पटवून देणार? उलट अशा पालकांची मुले व्यसनाधीनतेला लवकर बळी पडण्याचीच शक्यता जास्त. ही झाली शिक्षकांची बाजू किंवा शिक्षकांचे पालकांकडून असणारी अपेक्षा. पण ह्याला दूसरी बाजू आहे ती म्हणजे पालकांची आणि विद्यार्थ्यांची शिक्षकांकडून अपेक्षा. शिक्षक हा प्रशिक्षित असतो, मुलांच्या दृष्टीने प्रत्येक विषयातील तज्ज्ञ असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला पालकांच्यापेक्षा तो अधिक जबाबदार असतो. एखाद्या विषयामध्ये गोडी निर्माण करणे हे सर्वस्वी शिक्षकांचेच काम असते. गोडी निर्माण झाली की विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापनाकडे अधिक एकाग्रतेने लक्ष देतो. मन लावून अभ्यास करतो. परिणामी त्यांच्या मध्ये आत्मविश्वास निर्माण होतो व तो

परीक्षेमध्ये यशस्वी होतो. Nothing Suceesds like Success (यशासारखे यशदायी दुसरे काही नाही) ह्या उक्तीप्रमाणे तो पुढील परीक्षांमध्ये उत्तरोत्तर यशस्वी होत जातो. पण बऱ्याच वेळा शिक्षक विद्यार्थ्याला 'तुला डोकेच नाही. हा विषय तुला ह्या जन्मात येणार नाही.' असे नकारार्थी बोलून त्याला नाउमेद करतात. परिणामी त्याला त्या बद्दल नावड निर्माण होते. गणितासारख्या विषयाबद्दल मुलांच्या मनात नावड निर्माण आणि भीती असते, ह्याचे कारण त्या मुलांना प्राथमिक स्तरावर कशाप्रकारचे शिक्षक लाभले ह्यामध्ये सापडेल. शिक्षकांच्या ही काही मर्यादा आहेत, हे मलाही मान्य आहे. विशेषतः वर्गातील वाढती विद्यार्थी संख्या. त्यामुळे इच्छा असूनही शिक्षक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देऊ शकत नाही. त्यांना मार्गदर्शन करू शकत नाही. विद्यार्थ्यांना दिलेला गृहपाठ तपासणे ही आता जवळजवळ अशक्य गोष्ट झालेली आहे. वर्ष संपत आले तरी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना शिक्षक त्यांच्या नावाने ओळखत नसतो, असे विदारक चित्र आहे. बहुतेक विद्यार्थी क्लासला जात असतात, असे गृहीत धरुन अध्यापनामध्ये कुचराई करणे कधीही समर्थनीय होणार नाही. उलट प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे जे विद्यार्थी खाजगी शिकवणी वर्गांना जाऊ शकत नाहीत, जे आपल्या अभ्यासासाठी सर्वस्वी शाळेवर अवलंबून असतात त्यांच्यावर अन्याय केल्या सारखे ते होईल. शिक्षकाच्या अध्यापनातून विद्यार्थ्यांना त्या शिक्षकाला त्यांच्याबद्दल असलेली आस्था कळकळ, आपुलकी, जिव्हाळा, प्रेम जाणवले पाहिजे. शिक्षकांनी समरसून जीव ओतून उत्साहाने आणि जिवतपणे शिकवले पाहिजे. शैक्षणिक साधनांचा वापर करून आपले अध्यापन प्रभावी आणि परिणामकारक केले पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनाबद्दल गोडी आणि अभिरूची, आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे.

शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आदर्श असतो आणि अनुकरण करण्याजोगा असतो. मुले ही जात्याच अनुकरणप्रिय आणि संवेदनाक्षम असतात. मुले आपले सूक्ष्म निरीक्षण करत असतात ह्याची जाणीव, ह्याचे भान शिक्षकाला असले पाहिजे. शिक्षकाचे वागणे, चालणे, बोलणे, पेहराव आदर्श असला पाहिजे. शिक्षकाने बोलताना काळजीपूर्वक शब्द योजना केले पाहिजे. चुकूनही रागाच्या भरात, अनवधानाने अपशब्द उच्चारता कामा नये. विद्यार्थ्यांच्या आत्मसन्मानाला धक्का पोहोचेल असेही बोलण्याचे टाळावे. शिक्षक आपल्या वर्तनातून आचरणातून मुलांच्यावर कळत, नकळत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या संस्कार करत असतो. त्यामुळे त्याच्या बोलण्यामध्ये आणि वागण्यामध्ये विसंगती असता कामा नये. विविध सहशालेय उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांच्या प्रकटीकरणाला वाव दिला पाहिजे. आपल्या प्रचलित शिक्षण पद्धतीमध्ये बुद्धीवर अधिक भर आहे. भावना, मन ह्या गोष्टींना कमी महत्त्व दिले जाते. Head (बुद्धी), Heart (मन), आणि Hand (हात) ह्या त्रयींवर सारखाच भर दिला पाहिजे. विविध क्रीडास्पर्धा, सहली, प्रदर्शन, स्नेहसंमेलन, हस्तलिखित इ. विविध उपक्रमांचे आयोजन करुन शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये विविध मूल्ये विकसित करू शकतो. शिस्तप्रियता, सहकार, सहनशीलता, खिलाडुवृत्ती इ. गुणांचा विकास विविध सहशालेय उपक्रमांतून अप्रत्यक्षरीत्या होत असतो.

वरील विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, पालक, शिक्षक आणि विद्यार्थी ह्यांमध्ये समन्वय साधणे हे महत्त्वाचे आहे. पालक आणि शिक्षक ह्या दोन्ही महत्वाच्या घटकांची एकदिलाने, परस्पर सहकार्याने विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा साधता येईल ह्याचा विचार केला पाहिजे. त्यासाठी पालक-शिक्षक संघटना हा एक मार्ग आहे. ह्या संघटनेच्या वरचेवर 'सहविचार सभा' व्हायला हव्यात.ह्या सभांमधून प्रत्येक समस्येवर साधक-बाधक चर्चा करुन काम करणे शक्य आहे. ह्यावर सर्वांच्या संमतीने निर्णय घेतले गेले

पाहिजेत. पालकांमध्ये विविध क्षेत्रांमधील मान्यवर व्यक्ती, डॉक्टर, इंजिनियर, वकील, उद्योगपती, समाजसेवक इ. असतात. त्यांचेही मार्गदर्शन शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना होऊ शकते. शिक्षणामध्ये 'समाजाचा सहभाग' अभिप्रेत आहे मात्र त्यासाठी विचारपूर्वक नियोजन करणे आवश्यक आहे. म्हटलेच आहे 'योजकः तत्र दुर्लभः' समाजामध्ये बऱ्याच दानशूर व्यक्ती देखील असतात, त्यांच्या सहकार्याने शालेय इमारत, प्रयोगशाळा, ग्रंथालय, क्रीडांगण इ. भौतिक सुविधा, शैक्षणिक सुखसोयी आपण मुलांना उपलब्ध करून देऊ शकतो. 'सावित्रीबाई फुले दत्तक योजना' ही देखील त्या दृष्टीने उल्लेखनीय आहे. म्हटलेच आहे की 'विना सहकार, नही उद्धार' त्याच चालीवर, म्हणता येईल 'नाही पालक-शिक्षक समन्वय, कसा होईल विद्यार्थ्यांचा अभ्युदय ?'

सौ. अरुणा अरुण सामंत
ठाणे म.न.पा. शाळा क्र. १०
चितळसर पाडा, मानपाडा.

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

भग्न स्वप्नाच्या तुकड्यांना कवटाळून बसण्यासाठी मनुष्य जन्माला आलेला नाही ! मानवाचे मन केवळ भूतकाळाच्या साखळदंडांनी करकचून बांधून ठेवता येत नाही ! त्याला भविष्याच्या गरुडपंखांचे वरदानही लाभलेलं आहे. एखादं स्वप्न पहाणं, ते फुलविणं, ते सत्यसृष्टीत उतरावं म्हणून धडपडणं, त्या धडपडीतला आनंद लुटणं आणि दुर्दैवाने ते स्वप्न जरी भंग पावलं तरी त्याच्या तुकड्यांवरून रक्ताळलेल्या पायांनी दुसऱ्या स्वप्नामागनं धावणं, हा मानवी मनाचा धर्म आहे. मनुष्याच्या जीवनाला अर्थ येतो तो यामुळं

वि.स. खांडेकर
(अमृतवेल)

आज माझ्या आयुष्याला जो आकार आहे,
तो देणारे अनेक लोक आहेत, त्यांपैकी फार थोड्यांना
मी ओळखतो. बाकीचे अनेक लोक अज्ञात आहेत.
त्यांचीही मी जाणीव ठेवली पाहिजे. आज माझ्या घरात
मी जी वीज वापरतो, तिच्यासाठी दूरवरच्या कोळसा खाणीतील
कुणी कामगार अथकपणे परिश्रम करीत असतो.
मला शुद्ध पाणी पिण्यास मिळते. जीवनावश्यक गोष्टी
मला सहजगत्या उपलब्ध होतात. अशा रीतीने
मला आजपर्यंत जे प्राप्त झाले आहे आणि अजूनही होत आहे,
ते इतरांना प्राप्त करून देण्यासाठी मी परिश्रमांची पराकाष्ठा
केली पाहिजे. फक्त, 'मी तर त्यांच्यासाठी पैसे मोजतो'
असे म्हणून भागणार नाही.

- अल्बर्ट आइन्स्टाइन

# "कागद विरहित ग्रंथालये"

*ग्रंथालय सेवा समूहाच्या निबंध स्पर्धेत विद्यार्थी गटात प्रथम क्रमांक मिळालेला निबंध. - संपादक*

आजपर्यंत सर्व स्तरावर झालेल्या विकासामुळे मनुष्याच्या कार्याचा व्याप वाढला आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि साधने यांचा वापर करून कार्यशैलीचा विकास करण्याकडे मनुष्याचा कल राहिला आहे. व्यापार, उद्योग, शिक्षण, ग्रंथालय या क्षेत्रामध्ये संगणकाचा वापर सुरू झाला आहे. संगणकाची वापर करण्याची इच्छा, उत्सुकता आणि जागरूकता यामुळे सर्व क्षेत्रांमध्ये अधिकाधिक संगणकीकरण होणार आहे. संशोधन व शैक्षणिक ग्रंथालयाप्रमाणेच सार्वजनिक ग्रंथालयानीही संगणक वापरण्यास सुरवात केली आहे.



ग्रंथालयातील वेगवेगळ्या कार्यांचे मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरण करणे म्हणजे त्या ग्रंथालयाचे स्वयंचलित व्यवस्थापन (Library Automation) करणे होय. दूरध्वनी, दूरसंचार आणि दृक श्राव्य तंत्रज्ञानाच्या विकासामुळे या साधनांचाही ग्रंथालय सेवेच्या विकासाठी वापर करणे अपरिहार्य झाले आहे. स्वयंचलित ग्रंथालय व्यवस्थापनामध्ये संगणक व त्याची दुय्यम साधने, दूरध्वनी व दूरसंचार साधने यांचा दैनंदिन ग्रंथालय कार्यासाठी वापर करणे अभिप्रेत आहे. पंचकार्डापासून मुद्रणयंत्रापर्यंतची अर्ध स्वयंचलित व पूर्ण स्वयंचलित साधने यामध्ये समाविष्ट होतात. वाढत्या माहितीस्रोतांचे व्यवस्थापन करण्यासाठी मनुष्यबळाला संगणक संग्रालय साधनांची जोड देऊन ग्रंथालय सेवांचा विस्तार करणे आवश्यक झाले आहे. मनुष्यबळाच्या स्मृतीवरील ताण कमी करून संगणकाच्या स्मृतीवर हस्तांकित केल्यामुळे माहिती विस्फोटाचे नियंत्रण करणे सोपे जाणार आहे. संगणक हा मनुष्याच्या मेंदूचा पर्याय नसल्यामुळे ग्रंथालयातील संगणक वापरामुळे मनुष्यबळाची आवश्यकता नष्ट होईल अशी भीती बाळगण्याचे कारण नाही.

खूपशी माहिती लहानशा जागेत समावून ठेवण्यासाठी सूक्ष्मपटांचा उपयोग केला जातो. इलेक्ट्रॉनिक माध्यमातही प्रचंड माहिती अगदी थोडक्या जागेत सामावून ठेवता येते आणि तितक्याच कमी वेळात हवी तेव्हा परत प्राप्त करता येते. अनेक प्राथमिक आणि द्वितीयक प्रलेख सूक्ष्मपटांच्या स्वरूपात आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा खूपच वाढत्या प्रमाणातील वापरामुळे काही शास्त्रज्ञ भविष्यकाळ हे 'कागदरहित पुस्तके, नियतकालिकांचा काळ' आहे असे भाकित करू लागले आहेत. सूक्ष्मपट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या वापरामुळे नव्या माहितीच्या संप्रेषणात खूपच सुधारणा झाली आहे, हे खरे आहे.

सूक्ष्मपट (मायक्रोफॉर्मस्) ही मूलभूत स्वरूपाची संज्ञा असून जे प्रलेख मुळात कागदांवर छापलेले होते आणि नंतर छायाचित्रणाद्वारे अतिसूक्ष्म स्वरूपात छायाचित्रित केले आहेत त्या सूक्ष्म छायाचित्रित प्रलेख नुसत्या डोळ्यांनी वाचता येत नाहीत. त्यासाठी त्यातील मजकूराचा आकार मोठा करून पडद्यावर वाचता येईल अशी प्रतिमा निर्माण करणारे मायक्रोफॉर्म रीडर लागतात. सूक्ष्मपटांचे

मायक्रोफिलम, मायक्रोफिश (आणि अल्ट्रा फिश), मायक्रोओपेक, मटेरियल आणि अॅपेचर कार्ड हे चार प्रकार पडतात. यांपैकी मायक्रोफिलम आणि मायक्रोफिशचाच वापर जास्त करून होतो. बऱ्याच वाचकांना यांचा वापर करणे तितकेसे आवडत नसले तरी त्यातून खूप माहिती (मजकूर) अगदी थोड्या जागेत साठवता येत असल्याने जागेची प्रचंड बचत होते. सूक्ष्मपटातील प्रलेखांची किंमत कागदावर छापलेल्या त्याच्या प्रलेखाच्या (हार्ड-कॉपी) ४० ते ५० टक्क्यांनी कमी असते, कित्येक प्रलेख (विशेषतः संशोधन अहवाल) केवळ सूक्ष्मपट स्वरूपातच उपलब्ध असतात, सूक्ष्मपट स्वरूपात नियतकालिकांचे अंक जतन केल्याने केवळ जागेचीच नव्हे तर बांधणीच्या खर्चाचीही बचत होते. बरेच उपलब्ध प्रलेख सूक्ष्मपटांच्या रूपातच वाचकांना उपलब्ध असतात. उदाहरणार्थ केसरीचे स्थापना वर्षापासूनचे अंक, काही दुर्मिळ आणि नष्ट होत चाललेले छापील साहित्य सूक्ष्मपटांवर छायाचित्रित करुन प्रदीर्घ काळ जतन करता येते, ह्या सर्व कारणांमुळे त्यांचा ग्रंथालयातून उपयोग केला जातो.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये ऑन लाईन कॉम्प्युटराईज्ड डेटाबेसेस आणि कॉम्पॅक्ट डिस्क -रीड ओन्ली मेमरी (सी. डी. रॉम्स) ह्या नव्या दोन शोधांमुळे 'माहितीचा संच आणि प्रतिप्राप्ती' ची प्रक्रिया पूर्णतः बदलत्या आहेत.

डेटाबेसेसचे रेफरन्स डेटाबेसेस आणि सोर्स डेटाबेसेस हे दोन प्रकार आहेत. रेफरन्स डेटाबेसेसमध्ये छापलेल्या प्रलेखांची ग्रंथसूचीय माहिती जसे, ग्रंथकार व ग्रंथनाम, नियतकालिक नाव, खंड, वर्ष, पृष्ठे किंवा त्यांचे सार यांचा संग्रह संगणकात साठवून ठेवलेला असतो. दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे सोर्स डेटाबेसेसमध्ये मूळ प्रलेखांतील संपूर्ण मजकूर संगणकात नोंदवून ठेवलेला असतो.

ग्रंथसूचीय माहितीचा संचय करणाऱ्या डेटाबेसेसमध्ये केमिकल अॅब्स्ट्रॅक्टस, इंजिनअरिंग इंडेक्स, इंडेक्स मेडिकस ह्या महत्त्वपूर्ण सेवांचा समावेश होतो. हे डेटाबेसेस ज्या ठिकाणी संगणकार ठेवले आहेत तेथील संगणकाशी आपल्या संगणकाचा सांधा टेलिकम्युनिकेशन यंत्रणेद्वारे टेलिफोनच्या साहाय्याने जोडता येतो आणि आपल्या संगणकाने त्या दूरवरच्या डेटाबेस धारण करणाऱ्या संगणकाला योग्य त्या आज्ञा देऊन त्यावरील पाहिजे ती माहिती आपल्याला मिळवता येते. या पद्धतीला 'ऑन लाईन सर्च' असे म्हणतात. डेटाबेस संगणकाशी केलेल्या संगणकीय संवादातून आपल्याला उपयुक्त विषयांवरील प्रलेखांची यादी मिळू शकते. सोर्स डेटाबेस वापरल्यास याच पद्धतीने मूळ प्रलेखांमध्ये मजकूरही मिळू शकतो.सीडीरॉमचा शोध १९८५मध्ये लागला. सीडीरॉम ह्या ४.७२'' व्यासाच्या प्लास्टिकच्या तबकड्या असून त्यावर दोन लाख पन्नास हजार पानांचा मजकूर नोंदवता येतो. सी. डी. रीडर यंत्र साठी पर्सनल कॉम्प्युटरला एक सी. डी. रीडर यंत्र जोडावे लागते. सी. डी. रॉम डिस्कवर खोदलेल्या खाचा लेझर किरणांच्या साह्याने वाचल्या जातात.

सध्या कित्येक प्रकाशनांतील मजकूर सी.डी. रॉमवर उपलब्ध आहे. सुप्रसिद्ध ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीचे १६ खंड तीन सी.डी. रॉम्सवर उपलब्ध आहेत. अनेक निर्देश आणि सारसेवा आपले सेवा सी.डी. रॉमवर पुरवण्याच्या योजना तयार करीत आहेत. तंत्रज्ञानातील सुधारणांमुळे कमी होत असलेल्या किंमती, किमान चुका, सी.डी. रॉमवरील माहिती प्रतिप्राप्ती करण्याचे सुधारलेले तंत्र, अधिकाधिक वाचकांची सी.डी. रॉमच्या वापराची मानसिक तयारी ह्या गुणांमुळे माहितीचा संचय, प्रतिप्राप्ती आणि प्रसारणाचे एक महत्त्वपूर्ण साधन ह्या कारणांमुळे सी.डी. रॉमचा वापर, माहितीचा संचय, प्रतिप्राप्ती आणि प्रसाराचे एक महत्त्वाचे साधन म्हणून येत्या दशकात खूपच

वाढणारआहे.

दृक् - श्राव्य माध्यमी बनविण्यासाठी वापरलेल्या पदार्थावरून त्यांचे फिलम्स्, मॅग्नेटिक टेप्स, प्लास्टिक हे तीन प्रकार करण्यात येतात. फिल्मसमध्ये फिल्म्स स्ट्रिप्स, स्लाइडस्, सिनेफिलम यांचा समावेश होतो तर मॅग्नेटिक टेप्समध्ये साऊंड टेप ह्या विभागात ओपन रीलस व कॅसेट्स असतात आणि व्हिडोओ टेप्स ह्या विभागात ओपन रील्स, कॅसेट्स् असतात. प्लॅस्टिक्समध्ये ओपन रीलस व कॅसेटस् असतातआणि व्हिडोओ टेप्स ह्या विभागात ओपन रीलस, कॅसेटस् असतात. प्लास्टिक्समध्ये पारदर्शी प्लास्टिक्स ह्या विभागात ट्रान्सपरन्सीज असतात तर डिस्क ह्या विभागात ग्रामोफोन रेकॉर्डस, व्हिडोओ-डिस्क यांचा समावेश होतो.

संगणकाची प्रचंड संग्रहण क्षमता, गती आणि अचूकता या वैशिष्ट्यांमुळे संगणक वापर करण्याच्या दृष्टीने क्रांती झाली आहे. संग्रहता वैशिष्ट्यांसोबतच जलद माहिती पुनर्ग्रहण संगणकाद्वारे करता येते. हे लक्षात आल्यामुळे ग्रंथालय संगणकीकरणाच्या आवश्यकतेला चालना मिळाली आहे.

ग्रंथालय संगणीकरणाच्या इतिहासात डेटा प्रोसेसिंग साधनांचा वापर माहिती प्रक्रियेसाठी करण्याची सुरवात इ.स. १९३५ च्या सुमारास अमेरिकेमध्ये सर्वप्रथम झाली. टेक्सास विद्यापीठाने पंचकार्डाच्या मदतीने देवघेव करण्यास सुरवात केली. इ.स. १९४१ मध्ये मॉन्टक्लेअर पब्लिक लायब्ररी न्यू जर्सी या ग्रंथालयाने त्यावेळचे उपलब्ध तंत्रज्ञान वापरून देवघेव सुरु केली. इ. स. १९६० नंतर संगणकाचा वापर ग्रंथालयांच्या स्वयंचलित व्यवस्थापनाकरता करण्यास सुरवात झाली. उत्तर अमेरिका व ब्रिटनमधील ग्रंथालयानी संगणकाचा वापर करण्याचे दृष्टीने प्रथम पाऊल टाकले. एच. पी. लुहान यांनी इ.स. १९६१ मध्ये केमिकल ॲबस्ट्रॅक्टमध्ये येणाऱ्या लेख शीर्षकासाठी की वर्ड इंडेक्स तयार करण्यासाठी संगणक कार्यक्रम विकसित केला. अमेरिका व ब्रिटनमधील संशोधन ग्रंथालये आणि विद्यापीठ ग्रंथालये यांनी संगणकीकरणाच्या दृष्टीने मोठी आघाडी मारली. सार्वजनिक ग्रंथालयांनीही ब्रिटनमध्ये यासाठी पुढाकार घेतला. लंडन येथील मेट्रोपॉलिटन बरोजने ग्रंथसंग्रहाचे तालिकीकरण करण्यासाठी इ. स. १९६५ मध्ये मान्यता दिली. चार बरोजतर्फे या कार्याची सुरवात करण्यात आली. ग्रंथालय संगणकीकरणाच्या दृष्टीने ग्रंथदेवघेव आणि तालिकीकरण हे क्षेत्र प्रथम निवडण्यात आल्याचे आढळून आले. इ. स. १९६४ मध्ये ग्रंथवर्णनात्मक डाटा बेससाठी संगणकाची उपयुक्तता प्रथम लक्षात घेण्यात आली.

संगणक तज्ज्ञ हे ग्रंथालयशास्त्र व ग्रंथालयाच्या कामाचे स्वरूप याबद्दल अनाभिज्ञ असतात. ग्रंथालयांच्या समस्याबाबत त्यांना ज्ञानही नसते. त्यामुळे ग्रंथालयांच्या संगणीकरणामध्ये येणाऱ्या अडचणी व प्रश्नांना फारसे गांभीर्याने घेणे त्यांना आवश्यक वाटले नाही. त्यामुळे त्यांनी तयार केलेली संगणक प्रणाली ग्रंथालयांसाठी अपुरी व महागडी ठरली. ग्रंथालयांच्या कार्याची वास्तविकता लक्षात आल्यावर अपेक्षित उद्दिष्टांच्या दृष्टीने वाटचाल सुरु होण्यासाठी एक दशक जावे लागले. दूरसंचार संप्रेषण क्षेत्रांत इ.स. १९७० नंतर क्रांती झाली. या क्रांतीमुळे ग्रंथालय संगणकीकरणाच्या विचार गृह कार्यापुरता मर्यादित राहिला नाही. दूरसंचार संप्रेषणाच्या सोयीमुळे ओलिओ कॉलेज लायब्ररीसाठी विकसित केलेल्या ग्रंथालय सेवेचे जाळे संपूर्ण उत्तर अमेरिकेतील ग्रंथालयापर्यंत वाढत गेले. त्यातूनच आताचे ऑन लाईनकॉम्प्युटर लायब्ररी सेंटर (OCLC) अस्तित्वात आले. इ. स. १९७४ मध्ये येल, कोलंबिया आणि हावर्ड विद्यापीठ आणि न्यूयॉर्क पब्लिक लायब्ररी यांनी एकत्र येऊन रिसर्च लायब्ररी ग्रुप (RLG) स्थापन केला. इ. स. १९७८ मध्ये या ग्रुपने आपापसांतील सहकार्यासाठी सामान्य तांत्रिक कार्य प्रणाली तयार केली.

रिसर्च लायब्ररी इन्फर्मेशन नेटवर्कचा (RLIN) जन्म यातूनच झाला. या सहकारी तत्वावरील जाळ्यामुळे इतरही नेटवर्क विषसित होण्यास सुरवात झाली.

इ.स. १९८० नंतर मायक्रोकॉम्प्युटर्सचा विकास झाल्यामुळे ग्रंथालय संगणीकरणाच्या मागणीमध्ये वाढ झाली. सी. डी. रॉम तबकड्यांचा उपलब्धतेमुळे माहिती संग्रहम क्षमतेमध्ये वाढ झाली आहे. एका सी.डी. रॉम तबकडीवर २,७५,००० पृष्ठ्ये मजकूर साठविता येतो. नवीन आलेल्या डिजिटल ऑप्टिकल तबकड्यांची संग्रहण क्षमता यापेक्षा जास्त आहे. या उपलब्धीचा जास्तीत जास्त फायदा ग्रंथालयांना होणार आहे. ग्रंथालयांच्या संगणकीकरणाच्या क्षेत्रामध्ये वाढ होत आहे. कागदविरहित समाजाकडे आपली वाटचाल सुरु आहे असे म्हटले जात आहे. परंतु ग्रंथ व कागद यांना योग्य तो पर्याय अद्याप उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे ग्रंथालयांच्य सेवा विकसित करण्याच्या दृष्टीने संगणकाचा वापर करणे याला निश्चित महत्त्व प्राप्त झाले आहे हे निश्चित.

ग्रंथ निवड आणि ग्रंथ संपादन (Book Selection and Acquisition) तालिकीकरण (Cataloging), कालिके व नियतकालिके निवड, संपादन आणि नियंत्रण (Serials and Periodicals Selection, Acquisition and Control ), देवघेव नियंत्रण (Circulation Control), माहिती पुनर्ग्रहन सेवा (Information Retrieval Services), प्रशासकीय कार्य इत्यादि क्षेत्रांमध्ये ग्रंथालय संगणकीकरणाद्वारे विकास घडवून आणू शकतो

विशिष्ट माहितीच्या शोधासाठी दिशादर्शक साधन म्हणून निर्देशसूची प्रणाली इ.स १९६१ मध्ये विकसित केली. मराठीमध्ये मराठी नियतकालिकांची सूची,मराठी अनुवादित साहित्य सूची, ज्ञानदेव वाङ्मय सूची, ज्ञानदोय सार सूची, सत्यकथा सूची या सारखी साधने छापील स्वरूपात उपलब्ध आहेत. ही साधने संगणकीय माहिती पुनर्ग्रहण सेवेसाठी सीडी रॉमसारख्या अद्ययावत माध्यमावर येतील अशी आशा करण्यास हरकत नाही. ग्रंथालयात येणाऱ्या वाचकाला कोणत्याही साधनामधून माहिती उपलब्ध करून देणे असे माहितीसेवेचे आजचे स्वरूप आहे. संगणक व दूरध्वनी यांच्या मदतीने माहितीसेवा देण्याचे युग आले आहे. संगणकाच्या ऑनलाईन सेवेमुळे विकसित झालेले 'इंटरनेट' आज लोकप्रिय झाले आहे. माहिती पुनर्ग्रहण सेवे अंतर्गत वार्तापत्रे, मूल्यमापन अहवाल तयार करून देण्यासाठी संगणकाचा उपयोग होतो. ग्रंथ व कालिके यांच्या अनुक्रमणिकांची सूची ही तयार करून ऑन लाईन देता येते.

मायक्रोकॉम्प्युटरसाठी तयार करण्यात आलेली अत्याधुनिक व्यवस्थापकीय सॉफ्टवेअर पॅकेजस बाजारात उपलब्ध आहेत. प्रशासकीय कार्याच्या दृष्टीने What you see is what you get या पद्धतीने कार्य करणारे डेस्क टॉप पब्लिशिंग युजर्स पॅकेजही उपयुक्त आहे. मायक्रोसॉफ्ट ऑफिस हे तयार पॅकेज प्रशासकीय कार्यासाठी परिपूर्ण आहे. कारण या पॅकेजमध्ये प्रशाकसीय कार्याकरिता लागणारे वर्ड प्रोसेस स्प्रेडशीट, स्लाईडस् इत्यादींसारख्या सर्व सोयी आहेत. या कार्याशिवाय ग्रंथपरिगणन करणे, परिगणन अहवाल तयार करणे, न सापडलेल्या ग्रंथांच्या याद्या तयार करणे यासाठीही संगणकाचा वापर करता येतो. ग्रंथालय व माहिती सेवेचा राज्यस्तरीय विकास करण्यासाठी सर्व सार्वजनिक ग्रंथालयांनी एकत्र येऊन संगणकाचा वापर आणि कागदविरहित ग्रंथालयाचा वापर सुरु करणे ही आता काळाची गरज आहे.

**योगानंद दादाजी अहिराव**
पत्ता : ९/अ/६; एन.एम.एम.सोसायटी,
मुंबई-पुणे रोड समोर, कळवा (प.), ठाणे
दूरध्वनी : २४५५३४८५

पुस्तक परिचय

# आवर्जून वाचावं असं पुस्तक 'रक्त-रंग'

आयुष्य जगताना पावलोपावली, क्षणोक्षणी आपण माणसांच्या संदर्भात जगत असतो, विचार करीत असतो. काही माणसं मनाचा असा काही ठाव घेतात की आपल्या जगण्यात गुंतलेलं त्यांचं जगणं वजा करताच येत नाही. या उलट अस्पष्टसाही ओरखडा न उमटवता कित्येक माणसं गर्दीत हरवून जातात. ती भेटली होती याचेही सहज विस्मरण होते. काही माणसं आपल्या अस्तित्वात गुंतत जातात, तर काहींच्या अस्तित्वामध्ये आपण गुंतत जातो. सर्वच माणसांच्या रक्ताचा रंग लाल असला तरी त्यातील काहींचे रक्त आपल्या रक्ताशी विलक्षण 'मॅच' होते. अशा माणसांच आपलं निरीक्षण, आपल्याला त्यांचं भावणं कुठं तरी शब्दात बांधावं अशी उर्मी अनावर होते. यातूनच मराठी साहित्यात अगदी विशेष ठरतील अशी व्यक्तिचित्रं लिहिली गेली, जात असतात आणि वाचकही लेखकाचं भिंग वापरून 'माणूस' शोधण्याचा प्रयत्न करतो. शब्दाच्या पसाऱ्यात पसरलेली अशी माणसं समजावून घेतली तर आपल्यालाही जीवनाचे स्वरुप, गुंतागुंत कळायला लागते.

अशा व्यक्तींचे, त्यांच्या काही रंगांचे व अंतरंगाचे प्रकार तरी किती? अक्षरश:अगणित. काही प्रकार बाह्यवेषापर्यंतच थांबणारे तर काही मनाचा तळ शोधू पहणारे.काही प्रकारची माणसे थेट, रक्ताशीच नातं सांगतात. वेगळ्या भाषेत सांगायच तर त्यांचे व आपले सूर जुळतात, लय जुळते.

रुपारेल महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. प्रदीप कर्णिक यांच्या रक्त रंग या व्यक्तिचित्र संग्रहातील माणसं अशी, त्यांच्याशी सूर जुळलेली आहेत. यातील बापट सर, प्रधान सर यांच्याबाबत अधिक माहीत असल्याने त्यांच्याबद्दल कर्णिकांनी लिहिलेलं वाचलं तेव्हा त्यांच्या बाबतच्या जुन्या आठवणी मनात येत राहिल्या. या सर्व व्यक्तिचित्रांमधील (शेवटची दिलीप चित्रे यांची मुलाखत वगळता) समान सूत्र म्हणजे मनाची पकड घेणारी प्रवाही शैली . व्यक्तिचित्रणे करताना अनावश्यक भावुकता आली तर व्यक्तीचे अवास्तव उदात्तीकरण होते व अगदी त्रयस्थपणा बाळगला तर मानवी नात्यातील किमान लागतेपण पुसले जाण्याची भीती असते. व्यक्तिचित्रण चांगले व्हावयाचे असेल तर अशी पोझ आपल्या लेखनात न येऊ देणे महत्त्वाचे या सर्व व्यक्तिचित्रणात कर्णिकांनी हे चांगले साधले आहे.

या व्यक्तिचित्रण संग्रहात पुढील अकरा व्यक्तींचा समावेश आहे. १. रवींमामा : रविंद्र माधव दुर्वे २. लाखमोलाचा मित्र अरुण टिकेकर ३. बापदोस्त : प्रा. रमेश तेंडुलकर ४. नवे क्षितिजकार : विश्वास पाटील ५. निर्भिड मित्र: निखिल वागळे ६. माटुंग्यातला एकमेव 'पुरुष' : प्रा. पुष्पा भावे ७. प्रधानसर : प्राचार्य अशोक प्रधान ८. नायक : विनायक पडवळ ९. विश्वसनीय मित्र : प्रा. सुहास भालचंद्र बापट १०. मांडणीकार अरुण घाटे ११. कवितेबाहेरचा कवी : दिलीप पुरुषोत्तम चित्रे (मुलाखत).

या सर्व व्यक्तिमत्त्वांसाठी कर्णिकांनी वापरलेली विशेषणे अतिशय बोलकी, महत्त्वाची आहे. ही विशेषणे ही त्या व्यक्तीचा बहुमान आहे. त्यांच्या कर्तृत्वाचे अचूक वर्णन आहे.

कै. बापट सरांच्या आजारपणात त्यांच्या बरोबर असणाऱ्या मित्रांनी सरांसाठी जे केलं त्याची माहिती वाचताना मन भरून येतं.. कै. रमेश तेंडुलकर यांच्या साध्या

तरल प्राध्यापकी जीवनात 'सचिन तेंडुलकर नावाचा फिनोमिना' आला तरी सरांचे पाय जमिनीवरच होते याचे वर्णन वाचलं की अशीही माणसं असतात हे जाणवतं. सव्यासाची वाचक अणि व्यासंगी संपादक अरुण टिकेकरांचं वाचन प्रेमही अतिशय चांगल्या पद्धतीने त्यांच्यावरील लेखात येत.

कर्णिक स्वतः उत्तम वाचक व ग्रंथपाल असल्याने वाचलेली माणसं त्यांनी नीट समजावून घेऊन मांडली आहेत. प्रत्येक व्यक्ती तिच्या वाटेवर वेगळी चालत असली तरी लेखक या दुव्यात या व्यक्तीच्या वाटचालीचे संदर्भ गुंतले असतात. त्यामुळे या सर्व लेखात गेल्या तीस एक वर्षातील मुंबईतील सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब उमटणे साहजिकच होते. समकालीन असा हा भाग असल्याने मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालया, संशोधन मंडळ अशा संस्था, दुर्गाबाई भागवत, मनोहर जोशी, विजय तापस इ. व्यक्ती आणि काही सांस्कृतिक साहित्यिक सामाजिक सभा समारंभाचा तपशील येतो. याचा एक लाभ म्हणजे हा अलीकडील काळ असल्याने आपली आठवणींची उजळणी होते व जे नवीन असते ते नव्यानेच कळते. यातील 'रवीमामा' हे व्यक्तिचित्र असे वैयक्तिक संबंधातील असल्याने त्यांची माहिती नवीन. नवीन तरीही त्या काळातील वाचन लेखनाचे संदर्भ मनात जागवत जाणारी असते. या समकालीन घटना घडामोडीत या व्यक्तींना लेखकाचे जीवन समांतर असल्याने स्वतः लेखकाचे उल्लेख येणे अपरिहार्य आहे.

व्यक्तीचे बाह्य रूप व स्वभाव असे दोन्ही अंगांनी वर्णन या संग्रहात येते. उदा. कै. प्रा. रमेश तेंडुलकरांचा अव्यवस्थितपणा. त्याबाबत कर्णिक, 'अव्यवसिथतपणा हा त्यांचा स्थायी भाव होता.' हे निरीक्षण जसे नोंदतात तसेच त्या व्यक्तीच्या जडणघडणीतून व्यक्त झालेला स्वभाव हेरताना म्हणतात, 'सर कामाला वाघ आहेत. एकदा भिडले की भिडले.' 'सरांकडून मी खूप घेतलं, दिलं मात्र काहीच नाही.' किंवा घाटेंबद्दल लिहिताना, 'अस्ताव्यस्त मजकुराला आकार देणारा देखणेपणा बहाल करणारा, अबोल (हा शब्द महत्त्वाचा !) असा हा मांडणीकार होता.'

ओघवती शैली व व्यक्तिचित्रांची योग्य मांडणी यामुळे ही सर्व व्यक्ति चित्रं वाचनीय तर झालेली आहेतच. पण एका वेगळ्या उंचीवर गेली आहेत. उदाहरणादाखल काही नोंदी येथे केलेल्या असल्या तरी विनायक पडवळ, निखिल वागळे, पुष्पाताई भावे यांच्यावरील लेख मुळातूनच वाचावे असे आहेत.

पुस्तकाचा मोठा भाग व्यापणारा लेख म्हणजे (पृ. १०७ तग १६०) दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांची मुलाखत. बायोबिब्लिओग्राफीच्या निमित्ताने घेतलेल्या प्रदीर्घ मुलाखतीचा या पुस्तकात समावेश आहे. या मुलाखतीतून दिलीप चित्रे समजण्याच्या दृष्टीने उलगडत गेले आहेत.

प्रास्ताविकात लेखकाने म्हटले आहे त्याप्रमाणे हे लेख यापूर्वी नियतकालिकांतून आलेले आहेत. लेखाच्या शेवटी नियतकालिकाचा संदर्भ असला तरी अधिक बरे झाले असते. तसेच कर्णिकांचा परिचय व व्यक्तिनाम सूची ही देखील या व्यक्तिचित्र संग्रहाची गरज आहे. डिंपल प्रकाशनाने पुढील आवृत्तीत या उणीवा दूर कराव्यात ही अपेक्षा !

**'रक्त-रंग'**
लेखक : कर्णिक प्रदीप
मुंबई, डिंपल प्रकाशन, २००४
पृष्ठे - १६०,
मूल्य : रु. १५०/- फक्त.

- मोहन पाठक

# महाराष्ट्रातील स्त्री संत - मुक्ताई

*महाराष्ट्राच्या संत परंपरेत मुक्ताबाईचे स्थान महत्त्वाचे आहे . मुक्ताबाईच्या जीवन कार्याचा हा ढोबळ परिचय.*

*- संपादक*

आपला महाराष्ट्र ही खरोखरीच शूरवीरांची, क्रांतिकारकांची, सुजनांची, देशभक्तांची व संताची सुवर्णखाण आहे. इंग्रजांच्या गुलामगिरीतून सुटण्यासाठी सेनापती बापू गोखल्यांपासून ते क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, स्वातंत्र्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे असे अशी गर्जना करणारे, तरुणांना सैन्यांत भरती होण्यासाठी प्रोत्साहन देणारे स्वा. सावरकर अशी अनेक मंडळी आपल्या महाराष्ट्राच्या सुवर्णखाणीत जन्मलेली आहेत. या सर्वांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकरिता आपले सर्व आयुष्य पणाला लावलेले आहे. आपल्या महाराष्ट्राचे थोर दैवत असलेल्या शिवाजी महाराजांचे गुणवर्णन करावे तेवढे थोडेच होईल. त्यांचे राजकीय डावपेच, मुत्सद्दीपणा, गुणग्राहकता त्याचप्रमाणे माणसांची पारख, सर्व धर्मांविषयी सहिष्णुता हे गुण आदर्श अशा महापुरुषाचेच होते. अशा या शिवाजी महाराजांनी सुद्धा संत रामदास, संत तुकाराम यांचे शिष्यत्व अंगिकारले होते. आपल्या महाराष्ट्राची संतपरंपरा मोठी आहे. समाजातील माणुसकी नष्ट झाली, लोक स्वार्थी बुद्धीने घातकी आचरणाला निर्ढावले की त्यांची उन्नती करणाचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींना संत हे नामभिधान दिले जाते. आपल्या महाराष्ट्राची निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम व रामदास अशी अनेक संतांची थोर परंपरा आहे. त्यात मुक्ताई, जनाई, वेणाई अशा संत कवियित्रींचे स्थान अनन्यसाधारण आहे.

ज्या काळात स्त्री म्हणून जन्माला येणे हे गेल्या जन्मीचे पाप होय, अशी आपल्या सामाजाची धारणा होती. तसेच स्त्रीने फक्त जन्मभर कामाचा रगाडाच उपसायचा, स्त्रीला घराबाहेर पडण्यास बंदी, स्त्रीस्वातंत्र्य ही शब्दही तोंडातून काढणे अशक्य. अशी बंधने असलेल्या प्रतिकूल अशा सामाजिक परिस्थितीत या संत स्त्रियांनी, स्त्री जन्म आला म्हणून उदास होऊ नका अशी जागृती समाजात निमार्ण केली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा त्यांनी आपली समाधानी वृत्ती कधीही सोडली नाही. समाजहितासाठी त्यांनी आपले सर्व आयुष्य वेचले. तिघींचीही घराणी सात्त्विक आहेत, बाळबोध वळणाची आहेत तसेच त्यांच्या घरात देवाच्या उपासनेला अत्यंत महत्त्व आहे.

या तिघींमधील संत मुक्ताबाईच्या कार्याविषयीची माहिती आपण जाणून घेऊ या. मुक्ताबाईचा जन्म शके १२०१ घटस्थापनेच्या दिवशी झाला व त्यांचा समाधीकाळ शके १२१९ मध्ये तापी तीरावर झाला. जे वय खेळण्या बागडण्याचे, अठरा वर्षांच्या इतक्या अत्यंत अल्प अशा त्यांनी अमोल अशी कामगिरी केली. तापी नदीच्या तीरावर भागवतधर्माचा प्रसार केला. चमत्कारापेक्षा अभ्यासावर, आपल्या कामावर त्यांचा प्रचंड विश्वास होता. भागवत परंपरेतील संतमंडळीत मुक्ताबाईचे स्थान अनन्य साधारण आहे. हे स्थान तिला सिद्धसारस्वत ज्ञानेश्वरांची बहीण म्हणून नव्हे तर नाथपंथीय भजने व उपासना व संगीताचे तिला उपजतच ज्ञान होते. ती स्वयंसिद्ध होती. या आधीचे कित्येक जन्म, ज्ञान, नामसाधनेत जातात तेव्हा त्याचे सगणुरुप मनुष्याच्या दिव्य जन्मात देहरुपाने येते. ज्ञानेश्वरांच्या आईवडिलांनी (रुक्मिणी व विठ्ठलपंत) जेव्हा

नदीत प्राणार्पण केले तेव्हा मुक्ताई ही चारी भावडांत लहान होती. परंतु आईवडिलांच्या मृत्युला लहानपणीच शांतपणे सामोरी गेली . आईवडिल वारल्यामुळे लहानपणीच तिच्या अंगावर घराची जबाबदारी पडली. मुक्ताई व तिची भावंडे ही संन्याशाची मुले असल्यामुळे समाजाकडून त्यांना खूप छळ सोसावा लागला. एकदा मुक्ताईची सावली एका सोवळ्या आजींवर पडली तेव्हा त्या आजी खूप संतापल्या. तेव्हा लहानश्या मुक्ताईने त्यांना या रागट मनापेक्षा शुद्ध मनाने वागायचा उपदेश केला. त्यांचे वडील आपेगावला रहात. परंतु वडील गेल्यामुळे त्यांचे कुलकर्णीपण व मालमत्ता गेली म्हणून ही सर्व भावंडे आळंदीला आजोळी आली परंतु आजोळीही त्यांचा अपमानच झाला. मुक्ताईचे ताटीचे अभंग फार प्रसिद्ध आहेत. सिद्धसारस्वत अशा ज्ञानोबा माऊलींची समजूत काढताना आदिशक्ती मुक्ताईने त्यांना जीवनाविषयी सूक्ष्म विचार सांगितला आहे.

योगी पावन मनाचा । साहे अपराध जयाचा ॥
विश्व रागे झाले वन्ही । संती सुखे व्हावे पाणी ॥
शब्द शस्त्रे झाले क्लेश । संती मानावा उपदेश ॥
विश्व पट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

योगी मनाने पावन होऊन लोकांचे अपराध सहन करतो. जग पेटले तर योगी पाणी होतो यासाठी लोकांचे क्लेश सहन करावे.

तसेच आईबाबांच्या पश्चात घर सांभाळणारा, संन्याशांची मुले म्हणून समाजांतील लोकांनी केलेल्या छळाला सामोरा जाणारा, भिक्षा मागून अभ्यास करून पंडितांना जिंकणारा असा सिद्धपुरुष ज्ञानोबाराया जेंव्हा जिवतपणी समाधिस्थ झाला तेंव्हा निवृत्ती, सोपानदेव व मुक्ताई यांना खूप दुःख झाले. मुक्ताई सर्व भावंडात लहान असल्यामुळे संत ज्ञानेश्वरांनी मुक्ताईचे लाड केले होते. नंतर तीनही भावंडांना आळंदीत रहाणे जड जाऊ लागले. म्हणून मुक्ताई तापीच्या तीरावर सोमेश्वराच्या ठिकाणी महत ग्रामी गेली तिथे तिने भागवतधर्माचा प्रसार केला. स्त्रियांच्या ठिकाणी आत्मविश्वास उत्पन्न केला. स्त्रियांच्या विकासासाठी स्वतंत्र संघटना बांधून त्याच्यासाठी साधना केंद्रे उभारली. मुक्ताई उत्तम प्रवचनकार व निरुपणकार झाली व स्त्रियांनाही प्रवचन करण्यास तिने उद्युक्त केले. अशा रीतीने मुक्ताबाईचे स्त्रीविश्वात स्वतंत्र स्थान निर्माण झाले. मुक्ताईचे हळदीचे गाणे आजही उत्तर महाराष्ट्रात, मराठवाड्यात, विदर्भात मुलीला हळद लावताना म्हटले जाते. मुक्ताबाईचे कूट अभंग प्रसिद्ध आहेत. त्यांतील -

मुंगी उडाली आकाशी । तिनेगिळीले सूर्यासी ॥
थोर नवलाव जाहला । वांझे पुत्र प्रसवला ॥
विंचू पाताळासी जाय । शेष माथा वंदी पाय ॥
माशी व्याली घार झाली । देखोनि मुक्ताई हसली ॥

मुंगी म्हणजे सूक्ष्म, अत्यंत सूक्ष्म जीव. त्या ब्रह्मरूप जीवाला भक्तिसाधनेचे पंख मिळाल्यामुळे तिने झेप घेऊन प्रचंड अशा सूर्यालाही गिळले, वांझ स्त्रीला पुत्रप्राप्ती झाली, विंचू पाताळात गेला त्याला शेषशायी नागाने नमस्कार केला. माशी व्याली घार झाली व आकाशात उडाली या साऱ्या अशक्य गोष्टी नामसाधनेत निर्माण झालेल्या ब्रह्मसामर्थ्यामुळे शक्य झाल्या. अशा तऱ्हेने अनेक अभंगाच्या रचना मुक्ताईने केल्या. अशी ही मुक्ताई बीज होऊन तेजाची ज्योत तेवत ठेवून गेली. अशा या संत मुक्ताईला माझे कोटी कोटी प्रणाम.

दिव्यत्वाची जेथ प्रचिती ।
तेथे कर माझे जुळती ॥

**सौ. मालती देवधर**
कलाविहार, प्रशांतनगर। नौपाडा, ठाणे
दूरध्वनी : २५४० ३४६०

# आकाश आणि निरीक्षण (पंचागांच्या मदतीने)

*प्रा. सुरेंद्र बापट यांचा आकाशदर्शन, पंचांग व ज्योतिष यांचा अभ्यास सहाय्याने या विषयावर आमच्या विनंतीनुसार त्यांनी लिहिलेला लेख. - संपादक*

संध्याकाळी ऑफिस मधून परतताना कधी एखादी लोकल चुकली तर आपण आपल्या नशीबाला किंवा स्टार्स ना दोष देतो. अशावेळी घरी पोहोचेपर्यंत अंधार होऊन जातो सहज आपले आकाशाकडे लक्ष जाते. अचानक एखादा ग्रह अथवा तारा लक्ष वेधून घेतो. मग शाळेत विद्यार्थी असताना आपण शिकलेल्या काही गोष्टी आपल्याला अंधुक अंधुक आठवतात, जसे ग्रह कधीच लुकलुकत नाहीत आणि लुकलुकतात ते तारे ! मग आपल्या लक्षात येते की आपण पाहिलेली वस्तू ग्रह आहे. पण तो कोणता हे मात्र आपल्याला समजत नाही. प्रस्तुत लेखाद्वारे मी आपल्याला घरी असणारे 'पंचांग' या बाबतीत कसे उपयोगी पडते याचे विवरण देणार आहे.

आपल्या पैकी बहुतांचा असा समज आहे की पंचांग हे एक धार्मिक पुस्तक आहे, ज्यात केवळ काही सणावारांची माहिती व तारखा दिलेल्या असतात अथवा जास्तीत जास्त ग्रहणासंबंधी माहिती दिलेली असते.पण हा समज हे अर्धसत्य आहे. वास्तविक पंचांगाच्या मदतीने आपण इतर अनेक गोष्टी, जसे ग्रहांची परस्पर सापेक्ष स्थिती, ग्रहांचे वक्री व मार्गी होणे या गोष्टी सुद्धा जाणू शकतो. तसेच वेगवेगळी नक्षत्रे व राशी या केव्हा व आकाशातील कोणत्या भागात दिसतील या संबधीची माहिती मिळवू शकतो. या लेखातून आपण आकाशातील कोणत्या भागात कोणता ग्रह केव्हा दिसेल हे समजाऊन घेताना पंचाग कसे उपयोगी पडते ते पाहू.

आपण जर पंचांग उघडून पाहिले तर जवळपास प्रत्येक पानावर एक आयताकार आकृती Fig.(i) दिसते




Fig.(i)

ज्याला आपण पत्रिका म्हणतो व त्याचा संबंध खगोल शास्त्राशी न लावता ज्योतिष शास्त्राशी लावतो. परंतु ह्याच पत्रिकेचा उपयोग आकाशातील ग्रह व त्यांची स्थिती (Position) कळण्या करिता होऊ शकतो कसा ते पाहू या.





Fig.(ii)

Fig.(ii) मध्ये एक पत्रिका दाखवण्यात आली आहे ज्यात वास्तवातले आकाश म्हणजेच पूर्व क्षितीज ते पश्चिम क्षितीज व पंचागात आढळणारी पत्रिका यांची सांगड

घालण्यात आली आहे. या पत्रिकेत पूर्व व पश्चिम क्षितीय दर्शविण्यात आले आहे. मध्यभागी पृथ्वी आहे. अशी कल्पना करण्यात आली आहे. आकृतीच्या उजव्या भागात 'ख' हे अक्षर आपल्या बरोबर डोक्यावरील बिंदू दर्शविते. समजा आपणअशी कल्पना केली की आपण पृथ्वीवर प ह्या ठिकाणी उभे आहोत व आपले तोंड 'A' ह्या अक्षराकडे आहे. ह्याचाच वास्तवातील अर्थ म्हणजे आपण पूर्व क्षितीजा कडे तोंड करून उभे आहोत आपल्या बरोबर डोक्यावर 'ख' हा बिंदू आहे व आपल्या मागे पश्चिम क्षितीज म्हणजेच पत्रिकेमधील 'G' या अक्षराने दाखविलेला भाग येईल. म्हणजेच साधारण पणे B.C.D.E.F. ह्या अक्षरांनी दर्शविलेला पत्रिकेतील भाग आपल्याला दृष्य असणारे आकाश (पूर्व दिशे कडून पश्चिमदिशेकडे ) निर्देशित करतो. तर पत्रिकेत H.I.J.K.L ह्या अक्षरांनी दर्शविलेला भाग आपल्याला न दिसणारे आकाश निर्देशित करतो. एकंदर पत्रिकेतील भाग मोजले (A to L ) तर ते १२ भरतात. आपल्याला दिसणाऱ्या आकाशाची (पूर्व दिशे कडून पश्चिमदिशेकडे ) व्याप्ती १८०°ची आहे व आपल्याला न दिसणाऱ्या आकाशाची व्याप्ती पण तेवढीच म्हणजे १८०° एवढी आहे. म्हणजेच सर्व आकाशाची मिळून व्याप्ती १८०+१८० = ३६०° ची आहे. म्हणजेच पत्रिकेमध्ये ह्या ३६०° आकाशाची १२ भागात विभागणी करण्यात आली आहे. म्हणजेच पत्रिकेत एक भाग हा ३६०/१२= ३०° चा आहे. याचाच अर्थ असा की पत्रिकेतील A हा भाग आकाशातील पूर्व क्षितीजा पासून ३०° उंचीपर्यंतचा भाग दर्शवतो. तसेच पत्रिकेतील B हा भाग पूर्व दिशेकडील ३०° ते ६०° हा भाग दर्शवतो. या प्रमाणे G हा पत्रिकेतील भाग पश्चिम क्षितीजापासून ३०° उंचीपर्यंतचा भाग दर्शविते.

आता आपण Fig (iii) मध्ये दिलेली पत्रिका पाहू. ही पत्रिका आपल्याला एप्रिल २००५ ह्या महिन्यातील शेवटच्या ५दिवसांची आकाशस्थ ग्रहांची स्थिती समजावून





Fig (iii)

**एप्रिल २००५ महिन्यातील शेवटच्या पाच दिवसांची सूर्योदय कालीन पत्रिका**

देईल. Fig (ii) मध्ये A ह्या अक्षराच्या जागी येथे तुम्हाला १ रशु असे लिहिलेले आढळेल. ह्याचा अर्थ असा की एप्रिल २००५ ह्या महिन्यात सूर्योदयाच्या वेळेस पूर्व क्षितीजावर रवी व शुक्र हे ग्रह आहेत व ते मेष या राशीत आहेत. ह्या पत्रिकेत B ह्या अक्षराच्या तुम्हाला बु, रा असे लिहीलेले आढळेल व येथेच १२ हा आकडा आहे. ह्याचा अर्थ पूर्व क्षितीजापासून उर्ध्व दिशेला अंदाज़े ३०° ते ६०° ह्या अंशामध्ये बुध व राहू हे ग्रह आहेत. राहू हा ग्रह नसल्याने तो वास्तवात दिसणार नाही व ह्या भागात १२ हा आकडा येथे मीन रास असल्याचे दर्शवतो.




Fig (v)

**एप्रिल २००५ महिन्यातील शेवटच्या पाच दिवसांची सूर्योदया पूर्वी दोन तासांची पत्रिका**





Fig (iv)

**एप्रिल २००५ महिन्यातील शेवटच्या पाच दिवसांची सूर्योदयापूर्वीच्या चार तासाची पत्रिका (अंदाजे रात्री १ ते ३ सकाळ)**

याप्रमाणे आपण मंगळ, हर्षल, नेपच्युन, प्लुटो हे ग्रह एप्रिल महिन्यात सूर्योदयाच्या वेळेस कोठे दिसतील ह्याचा अंदाज २ ते ५ ह्या वेळातील आकाशस्थ ग्रहांची स्थिती जाणून घ्यावयचा असेल तर पत्रिकेतील सर्व ग्रह प्रत्येकी एक एक भाग मागे न्यावे लागतील ह्याचाच अर्थ पत्रिका आता Fig (iv) मध्ये दाखविल्याप्रमाणे असेल. आता बुध ग्रह पूर्व क्षितीजापासून ३०° अंशापर्यंत आढळेल. सूर्य व शुक्र ग्रह हे दिसणारच नाहीत. कारण ते दृश्य गोलाधार्त नाहीत. मंगळ ग्रह पूर्व क्षितीजावर ३०° ते ६०° अंशात कुंभराशीत दिसले. ह्या प्रमाणे आपण दिवसाच्या वा रात्रीच्या कोणत्याही वेळी कोणता ग्रह कोठे दिसेल / असेल ते निश्चित करु शकतो त्याकरीता आपल्याला सूर्योदयानंतरच्या प्रत्येक दोन तासासाठी पत्रिकेतल सर्व ग्रह एक एक भाग पत्रिकेतील सर्व ग्रह एक एक भाग मागे anticolckwise न्यावे लागतील. उदाहरणार्थ समजा आपल्याला सूर्योदयापूर्वीच ४ तासाची ग्रहांची स्थिती जाणून घ्यावयाची असेल तर Fig (iii) मध्ये असलेले सर्वग्रह २-२ भाग मागे (anticlockwise) न्यावे लागतील व आपल्याला Fig vi मध्ये दाखवलेली पत्रिका मिळेल व त्यानुसार आपण आकाशस्थ ग्रहांची स्थिती Position निश्चित करु शकतो.

पंचांगात प्रत्येक महिन्याच्या दोन पंधरवड्यांची पत्रिका उपलब्ध असते त्यावर वरील प्रमाणे संस्करण करुन आपण वर्षातील कोणत्याही दिवसांचे आकाश निरीक्षण करु शकतो.

**प्रा. सुरेंद्र बापट**

पदार्थ विज्ञान विभाग,

बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

दिशा
नियमित
वाचा

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकरांचे शिक्षण क्षेत्रातील काम मोलाचे - डॉ. दिपक फाटक

विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांचे शिक्षणक्षेत्रातील काम मोलाचे असून, त्यांच्या स्मृतिदिनाच्या कार्यक्रमास माझ्यासारख्या एका शिक्षकाला बोलाविणे हा मी माझा गौरव समजतो, असे उद्‌गार माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ डॉ. दीपक फाटक यांनी काढले. डॉ. बेडेकरांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त 'भारत आणि संगणक' या विषयावर आयआयटीचे प्राध्यापक डॉ. दीपक फाटक यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

व्ही. पी. एम्. तंत्रनिकेतनाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात प्रा. फाटक यांनी सांगितले की, जून १९४८च्या दरम्यान संगणकाचा वापर फक्त गणना करण्यासाठी होत असे. १९५३-५५ च्या दरम्यान त्यात माहिती जमा होऊ लागली. १९६० साली कॉमन बिझनेस ओरिएन्टल लॅंग्वेज अस्तित्वात आली. १९६०-८० दरम्यान आकाराने छोटे परंतु जास्त क्षमता असणारे कॉम्प्युटर बाजारात होऊ लागले. भारतात आकाराने मोठ्या असणाऱ्या कॉम्प्युटर्सची निर्मिती १९६०च्या काळात टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फन्डामेंटल रिसर्च सेंटरमध्ये हाती घेण्यात आली होती, १९८०-२००० साली पर्सनल कॉम्प्युटर्सची निर्मिती होऊ लागली आणि आकाराने लहान व स्वस्त दरात कॉम्प्युटर्स उपलब्ध होऊ लागले. वेबसाईट तयार होऊ लागल्या आणि मुंबईसारख्या शहरात संगणकीय लाट आली, याकडे फाटक यांनी लक्ष वेधले.

देशातील सर्व शहरांमध्ये प्रामुख्याने संगणकाचा वापर होत आहे. शासकीय यंत्रणेतदेखील माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून अवघ्या अर्ध्या तासात योग्य ती कागदपत्रे उपलब्ध होतात, पण भारतात १००० व्यक्तीमागे कॉम्प्युटर्स प्रमाण केवळ सात इतकेच आहे. चीनमध्ये १००० व्यक्तींमागे ३५, तर प्रगत राज्यांमध्ये ३२८ ते ५३२ इतके हे प्रमाण आहे. बाजारपेठेत नेहमी वेळेबरोबर वस्तूंची किंमत वाढत जाते, परंतु हे एकच क्षेत्र आहे की ज्यात वेळेबरोबर महत्त्व वाढत गेले पण त्याची किंमत हळूहळू कमी होत गेली, अशी माहिती फाटक यांनी दिली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस 'स्मृतिगंध' या पुस्तकाचे प्रकाशन प्रा. दीपक फाटक यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तकाचे संपादक अशोक चिटणीस यांचेही भाषण झाले. कला व वाणिज्य महाविद्यालयातर्फे 'युवाशिल्प' हा डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती विशेषांकही प्रसिद्ध करण्यात आला.

*लोकसत्ता - ठाणे वृत्तान्त, गुरुवार २१ एप्रिल २००५ , रविंद्र नामदेव सोनावळे*

(श्री. सोनावणे हे बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे वृत्तपत्र विद्येचे विद्यार्थी आहेत.-संपादक)

भारत येत्या २००८ सालापर्यंत संगणक आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये जगाला ज्ञान देऊ लागेल असा विश्वास आयआयटी मुंबईचे प्राध्यापक शास्त्रज्ञ डॉ. दीपक फाटक यांनी व्यक्त केला.

विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर प्रथम स्मृतिदिन 'भारत आणि संगणक' या विषयावरील माहितीपूर्ण व्याख्यानाने संपन्न झाला. त्यात बोलताना त्यांनी हा विश्वास व्यक्त केला. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीपाद करंदीकर आणि कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व्यासपीठावर उपस्थित होते.

संगणक विविध क्षेत्रात क्रांती करत राहणार आहे. तुम्ही त्याच्या बरोबत न गेल्यास तो तुम्हाला सोडून पुढे जाईल. क्रांती कुणासाठी थांबणारी नाही. असे स्पष्टपणे नमूद करून डॉ. फाटक यावेळी पुढे म्हणाले, ''या पुढे जगाच्या बरोबर चालायचे असेल तर भारतीयांनी संगणक तत्वाची अंगिकार केला पाहिजे. कागद, पेन, पेन्सिल या गोष्टी जशा रुजल्या त्याचप्रमाणे समाजाच्या प्रत्येक स्तरात माहिती तंत्रज्ञान रुजून ते अंगवळणी पडले पाहिजे.'' भारतामध्ये सध्या हजार माणसामागे ७ कॉम्प्युटर अशी स्थिती असून ती संख्या १० होण्याच्या मार्गावर आहे. परंतु जगाच्या तुलनेत ही गती कमी असल्याचे त्यांनी त्यावेळी बोलतांना सांगितले.

हा विषय आता केवळ कौतुकाचा वा चर्चेचा राहिलेला नसून तो जिव्हाळ्याचा झाला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी त्यावेळी बोलतांना व्यक्त केली.

कॉम्प्युटर हे एकमेव यंत्र असे आहे की दिवसेंदिवस ज्याची क्षमता वाढत असतानाच त्याची किंमत मात्र कमी कमी होत आहे. असे नमून करून डॉ. फाटक यावेळी म्हणाले की, येत्या वीस वर्षात संगणक शास्त्रात काही न केल्यास वेळ निघून गेलेली असेल.

२००१ च्या जनगणनेनुसार ६ ते १९ या वयोगटातील साडेसदतीस कोटी व्यक्ती कॉम्प्युटरची शिक्षण घेण्यासाठी इच्छुक आहेत. दर वर्षी अडीच कोटी या वयोगटातील तरुण या विडोमध्ये काम करण्यासाठी निर्माण होत आहेत. त्यामुळे भारताची लोकसंख्या ही बाब कॉम्प्युटर आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासाठी ॲसेट मानून काम करण्याची आवश्यकता त्यांनी यावेळी प्रतिपादन केली.

एक वर्ष रजा घेऊन केलेल्या भारत भ्रमणात अनेकांशी भेटून आणि प्रत्यक्ष परिस्थिती पाहिल्यानंतर ही गोष्ट लक्षात आल्याचे त्यांनी सांगितले.

भारत भ्रमणामध्ये अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी भेटले. काही चांगले करावे असे वाटणारे प्रत्येक ठिकाणी शिक्षकही भेटले. नवीन शिकण्याची इच्छा, ज्ञानाची लालसा त्यांच्यामध्ये दिसून आली, अशी माहिती त्यांनी त्यावेळी बोलताना दिली.

डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त काढण्यात आलेल्या 'स्मृतिगंध' ग्रंथाचे तसेच 'युवाशिल्प' चे प्रकाशन डॉ. दीपक फाटक यांच्या हस्ते झाले. डॉ. विजय बेडेकर यांनी प्रास्ताविक करून पाहुण्यांचे स्वागत केले.

सूत्र संचलन श्री. नरेंद्र बेडेकर यांनी केले तर सुरुवात सौ. सुमेधा बेडेकर यांनी सादर केलेल्या प्रार्थनेनी झाली.

तंत्रनिकेतन सभागृहात झालेल्या कार्यक्रमास महाविद्यालय व शाळा परिसरातील शिक्षक तसेच निमंत्रक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- संकलित

**सौ. आनंदीबाई केशव जोशी स्कूल, ठाणे**

**नाटक स्पर्धा**

१३ सप्टेंबर २००४ रोजी संस्कृती कला दर्पण तर्फे झालेल्या नाटक स्पर्धेत आपल्या शाळेच्या इ. ४थी च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'कोल्होबाची लबाडी' या नाटकाला तीसरे पारितोषिक मिळाले.

**ॲबाकस स्पर्धा**

६ फेब्रुवारी २००५रोजी आयडिअल ॲबाकस प्राइव्हेट लिमिटेड तर्फे चेन्नई येथे आयोजित केलेल्या स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर आमच्या शाळेतील विद्यार्थीनी कु. प्रज्ञा प्रसादे हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

## आगळा वेगळा निरोप-समारंभ



कचराळी तलाव येथे मुलांना सजवलेल्या बग्गीत बसवून फिरवताना.

शुक्रवार दि. ७/४/२००५ रोजी पूर्व प्राथमिक विभागातील मोठा शिशु वर्गाला आगळावेगळा निरोप समारंभ देण्यात आला. हा निरोप समारंभ शाळेत साजरा न करता या दिवशी २६६ मुलांना कचराळी तलाव येथे दु. २.३० नेले. त्यानंतर मुलांना सजवलेल्या बग्गीत बसवून कचराळी तलवाला पूर्ण फेरी केली. तसेच सर्व मुलांना नौकेतून फिरवण्यात आले. तेव्हा मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. नौकेतून फिरुन आल्यावर मुलांना भेळ व कुल्फी देण्यात आली. कचराळी तलावाच्या आजुबाजुच्या सर्व गोष्टी मुलांना पहाता आल्या. (उदा. महानगरपालिका, परमार्थ निकेतन इ.) या दिवशी मुले जेव्हा आईबाबांबरोबर घरी जायला निघाली तेव्हा या कार्यक्रमाचे चीज झाल असं मनापासून वाटलं

हा निरोप समारंभ मोठ्या शिशुतून पहिलीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी होता. या कार्यक्रमाला बग्गीवाले पाटील तसेच रिक्षाचालक श्री. पाठकजी यांची अतिशय मोलाचे सहकार्य लाभले. पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. वैद्यबाई व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने हा समारंभ खूपच छान साजरा झाला.

## आगामी परिषदा

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

आयोजित

### अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत

या विषयावरील चर्चासत्र

दिनांक : २७ व २९ ऑगस्ट २००५

जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय

आयोजित

### मराठी आणि संगणक

या विषयावरील चर्चासत्र

दिनांक : २८ जानेवारी २००५

पहिली कार्यशाळा: दिनांक ८ मे २००५

दुसरी कार्यशाळा : दिनांक २५ सप्टेंबर २००५

अधिक माहितीसाठी आमच्या

www.vpmthane.org

या संकेतस्थळाला भेट द्या.